Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २०२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. १० सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## आशिया कपमधील भारत-पाकिस्तान सामन्यावर बंदीसाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका

### भारत - पाकिस्तान सामन्याचा थरार १४ सप्टेंबरला रंगणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०पुणे**

आशिया कप स्पर्धेत १४ सप्टेंबर रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात क्रिकेट सामना होणार आहे. मात्र या सामन्यावर बंदी घालण मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. विशेष म्हणजे याचिकेत या समान्याला असंवैधानिक घोषित करण्यात यावे असेही म्हटले आहे. त्यामुळे जगभरातील क्रिकेट चाहते आतुरतेने वाट पाहातात अशा हाय-व्होल्टेज सामन्याचे भवितव्य अनिश्चित झाले आहे.



पुण्यातील सामाजीक कार्यकर्ते केतन तिरोडकर यांनी ही याचिका दाकल केली आहे. मे महिन्यात २६ लोकांचा मृत्यू झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारत आणि पाकिस्तान यांच्यात सामने होऊ नयेत, असे याचिकेत म्हटले आहे.

तिरोडकर यांनी त्यांच्या याचिकेत म्हटले आहे की भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हा सामना संविधानाच्या कलम २१ चे उल्लंघन करतो. संविधानाचे कलम २१ हे भारतीय नागरिकांना 'जीवनाचा आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा' हक्क देते. यामुळे प्रत्येक नागरिकाला सन्मानाने आणि सुरक्षितपणे जगण्याचा अधिकार मिळतो.या याचिकेतून संविधानाच्या कलम ३२ अंतर्गत आदेश किंवा इतर योग्य रिट देण्याची मागणी करण्यात आली आहे, ज्यामध्ये सरकारला नॅशनल स्पोर्ट्स गव्हर्नन्स ॲक्ट, २०२५ लागू करण्याचे आणि भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला (BCCI) तात्काळ प्रभावाने नॅशनल स्पोर्ट फेडरेशन (NSF) अंतर्गत आणण्याचे निर्देश द्यावेत असे म्हटले आहे.तसेच याचिकेत बीसीसीआयला नॅशनल स्पोर्ट्स गव्हर्नन्स ॲक्ट, २०२५ अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या नॅशनल स्पोर्ट्स बोर्डाने (NSB) घालून दिलेल्या नियम आणि मार्गदर्शक तत्वांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशी मागणीही केली गेली आहे.भारत विरुद्ध पाकिस्तान सामना हा आपले सैन्य दलांना आणि नागरिकांना 'आम्ही तुमची पर्वा करत नाहीत', असा देशविरोधी संदेश देत असल्याचा दावा या याचिकेत केला गेला आहे. दरम्यान शुक्रवारी (१२ सप्टेंबर) भारताचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर या याचिकेची सुनावणी होणार आहे. याचा निर्णय काय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आशिया चषक ९ ते २८ सप्टेंबरदरम्यान खेळवला जाणार आहे. आशिया चषकात प्रथमच ८ संघ खेळणार आहेत. या ८ संघांची दोन गटांत विभागणी करण्यात आली आहे. ८ पैकी ४ संघ म्हणजेच दोन्ही गटातून दोन दोन संघ सुपर फोरसाठी पात्र ठरतील आणि त्यानंतर उपांत्य आणि अंतिम फेरीसाठी संघांची निवड होईल. दरम्यान टी -२० फॉरमॅटमध्ये खेळवण्यात येत असलेल्या या स्पर्धेत भारत - पाकिस्तान सामन्याचा थरार १४ सप्टेंबरला रंगणार आहे. मात्र त्यापूर्वी सर्वोच्च न्यायालय यावर काय निर्णय घेते हे पाहाणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## मराठा आरक्षणासाठी सरकारकडून ९ कोटी ६० लाख रूपयांची मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

मराठा आंदोलनाबाबत देवेंद्र फडणवीस सरकारने आज मोठा निर्णय घेतला आहे. आंदोलनावेळी मृत्युमुखी पडलेल्या नातेवाईकांना मदत देण्यात आली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणाच्या मागणीसाठी पुकारलेल्या आंदोलनात त्यांनी मृताच्या नातेवाईकांना मदत करण्यात यावी, अशी मागणी केली होती. त्याबाबत सरकारकडून दोन सप्टेंबर रोजी त्यांना अश्वासन दिले होते. फडणवीस सरकारने आज मराठा आंदोलनात मृत्युमुखी पडलेल्यांच्या नातेवाईकांना ९ कोटी ६० लाख रुपये वर्ग केले आहेत. सरकारने आंदोलनातील महत्वाची मागणी पूर्ण केली.



मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आंदोलनातील ही एक महत्त्वाची मागणी आता पूर्ण झाली आहे. मराठा आंदोलनात २५४ जणांचा मृत्यू झाला होता. यातील ९६ मृतकांच्या नातेवाईकांना काल ९ कोटी ६० लाख रुपये वर्ग करण्यात आले आहेत. तर याआधी १५८ मृतांच्या नातेवाईकांना १० लाख रुपया प्रमाणे मदत करण्यात आली होती. त्यामुळे आतापर्यंत मराठा आंदोलनात मृत्यू झालेल्या सर्व नातेवाईकांना अर्थिक मदत पूर्ण करण्यात आलीय.

## नेपाळी सैन्याने देशाच्या सुरक्षेचा ताबा घेतला, परिस्थिती सामान्य

### संध्याकाळी ५ ते पहाटे ६ वाजेपर्यंत कर्फ्यू लागू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०काठमांडू**

भारताच्या शेजारील देश नेपाळमध्ये परिस्थिती खूपच बिघडत चालली आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेले निदर्शनं खूपच हिंसक झालीत. राजधानी काठमांडूच्या रस्त्यांवर विद्यार्थी नेपाळ सरकारविरुद्ध तीव्र निदर्शने करीत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, निदर्शनांमध्ये बंदुकधारी लोकही दिसले असून, निदर्शने आता हिंसक होऊ लागली आहेत. मंगळवारी तत्पूर्वी देशाचे पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी पदाचा राजीनामा दिला होता. तसेच सरकारच्या इतर मंत्र्यांनीही राजीनामा देण्याचा निर्णय घेतला होता. सर्व मंत्री आणि नेते देश सोडण्याचा विचार करीत आहेत. निदर्शक विद्यार्थ्यांनी केपी शर्मा ओली सरकारच्या अनेक मंत्र्यांना मारहाण केलीय. विद्यार्थ्यांनी नेपाळी संसद आणि माजी पंतप्रधानांच्या घरालाही आग लावली.



परिस्थिती पाहता नेपाळी लष्कराने लष्करी कर्मचारी आणि इतर सुरक्षा एजन्सींच्या तैनातीबाबत एक प्रेस रिलीज जारी केलीय. जारी केलेल्या प्रेस रिलीजनुसार, सध्याच्या प्रतिकूल परिस्थितीचा गैरफायदा घेत काही गट नागरिकांचे आणि सार्वजनिक मालमत्तेचे मोठे नुकसान करीत आहेत, लूटमार आणि जाळपोळ करीत आहेत. नेपाळ लष्कर पुन्हा एकदा अशा कारवायांमध्ये सहभागी होऊ नये, असे आवाहन करते. जर अशा कारवाया थांबल्या नाहीत, तर नेपाळ आणि नेपाळी लोकांच्या सुरक्षिततेसाठी आमचे सैन्य आणि सर्व सुरक्षा एजन्सी रात्री १० वाजल्यापासून कर्तव्यावर राहतील. आम्ही संपूर्ण देशाकडून सहकार्याचे आवाहन करतो. यानंतर सुरक्षा परिस्थितीचे पुनर्मूल्यांकन केले जाईल आणि पुढील माहिती जारी केली जाईल.

भारतीय दूतावासाने दिलेल्या सर्व स्थानिक सुरक्षा सल्लूयांचे पालन करण्याचा सल्ला देण्यात आलाय. मंत्रालयाने मदतीसाठी आपत्कालीन संपर्क क्रमांक देखील शेअर केले आहेत. काठमांडूमधील भारतीय दूतावासाशी या संपर्क क्रमांकांवर संपर्क साधता येईल: +९७७-९८० ८६० २८८१ (व्हॉट्सॲपवर देखील उपलब्ध आहे) आणि +९७७-९८१ ०३२ ६१३४ (व्हॉट्सॲपवर देखील उपलब्ध आहे). परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे की, नेपाळमध्ये असलेल्या भारतीय नागरिकांना त्यांच्या सध्याच्या निवासस्थानात राहण्याचा, बाहेर पडणे टाळण्याचा आणि पूर्ण खबरदारी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. दरम्यान, सरकारने नेपाळमधील घडामोडींवर चर्चा करण्यासाठी कॅबिनेट समितीची बैठक घेतलीय. पंतप्रधान नरेंद्र मोदी पंजाब आणि हिमाचल प्रदेशातील पूरग्रस्त भागांचे हवाई सर्वेक्षण करून परतल्यानंतर ही बैठक झाली.

## उद्धव ठाकरे पुन्हा राज ठाकरेंच्या घरी संजय राऊत, अनिल परबही सोबत

### महापालिका निवडणुकीत एकत्र येण्याच्या चर्चेला बळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी पुन्हा एकदा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. यापूर्वी गणेश उत्सवाच्या निमित्ताने उद्धव हे राज यांच्या घरी गेले होते. त्यानंतर आज पुन्हा एकदा ते त्यांच्या घरी गेलेत. या भेटीमुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चेला बळ मिळाले आहे.



महाराष्ट्राच्या राजकारणात गत काही महिन्यांपासून ठाकरे बंधूंच्या आघाडीची चर्चा रंगली आहे. राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे यांच्या निवासस्थानी गेले होते. त्यानंतर उद्धव ठाकरे अनेक वर्षांनंतर गणेश उत्सवाच्या निमित्ताने राज यांच्या घरी गेले होते. या भेटीत त्यांनी तिथे जेवणही केले होते. त्यानंतर आज पुन्हा एकदा उद्धव ठाकरे हे राज यांच्या शिवतीर्थ या निवासस्थानी गेलेत. उद्धव यांची ही भेट कौटुंबिक आहे की राजकीय? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण उद्धव यांच्यासोबत खासदार संजय राऊत व आमदार अनिल परब आहेत. त्यामुळे उभयंतांच्या या भेटीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसह संभाव्य राजकीय आघाडीवर चर्चा सुरू असल्याचा दावा केला जात आहे.

**२ दिवसांपूर्वीच ठरली बैठकीची रुपरेषा**

उल्लेखनीय बाब म्हणजे ठाकरे बंधूंची आजची भेट पूर्वनियोजित असल्याचाही दावा केला जात आहे. ठाकरे बंधूंची आजची भेट अचानक झाली नाही. ती पूर्वनियोजित आहे. दोन दिवसांपूर्वीच या बैठकीची रुपरेषा ठरली होती. या वाढत्या भेटीगाठीमुळे राज व उद्धव यांच्यातील वैचारिक दुरावा कमी होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**काँग्रेस नेत्यांनी दोन दिवसांपूर्वीच घेतली होती ठाकरेंची भेट**

महाराष्ट्र काँग्रेसच्या काही प्रमुख नेत्यांनी दोन दिवसांपूर्वीच मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती. यावेळी राज ठाकरे यांच्या मनसेला महाविकास आघाडीत घेण्याच्या मुद्यावर धीरगंभीर चर्चा झाली होती. त्यात काँग्रेसने अत्यंत सावध भूमिका घेतली होती. या प्रकरणी हायकमांडशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे या नेत्यांनी उद्धव ठाकरे यांना सांगितले होते. त्यानंतर लगेचच उद्धव यांनी आज राज ठाकरे यांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली हे विशेष.

## दोन्ही बंधूंनी एकत्र येत लढावे, आमच्या त्यांना शुभेच्छा

### उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंच्या भेटीवर चंद्रशेखर बावनकुळेंची प्रतिक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

आमच्या पक्षाकडून त्यांना शुभेच्छा आहेत. त्यांनी कौटुंबिक एकत्र यावे, एकत्र लढावे, राजकारणातही एकत्र यावे, आमचे त्याबद्दल काही ना नाही. राज साहेब आणि उद्धव साहेब वेगळे का झाले, तर राजकीय कारणांमुळे. राजकारणात त्यांचे पटले नाही म्हणून वेगळे झाले. आता राजकारणात त्यांचे पटायला लागले म्हणून एकत्र आले. त्यात आमचा बोलण्याचा काय अधिकार आहे? असा प्रश्नही उपस्थित करत भाजप नेते व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या आजच्या भेटीवर प्रतिक्रिया दिली आहे.



चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी आरक्षण उपसमितीची पहिली बैठक पार पडली आहे. यावर माहिती देताना बावनकुळे म्हणाले, इतर मागासवर्गीय समाजाच्या (ओबीसी) सामाजिक शैक्षणिक व आर्थिक स्थिती तसेच इतर संलग्न बाबींवरील करावयाच्या कार्यवाहीबाबत माझ्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ व समितीची बैठक मंत्रालयातील माझ्या दालनात झाल्याची माहिती त्यांनी दिली आहे.

## शेतकऱ्यांचे आत्मबल क्षीण होत आहे, त्यामुळेच शेतकरी आत्महत्या वाढल्या; श्री श्री रविशंकर कडाडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नागपूर**

विदर्भात शेतकऱ्यांचा आत्महत्या अजूनही सुरू आहेत. शेतकऱ्यांचे आत्मबल क्षीण होत आहे, यापूर्वी अनेक अडचणीतून आपण मार्ग काढला आहे. काही वर्षांपूर्वी ३७० गावागावांत पदयात्रा काढली. १० वर्षानंतर पुन्हा पदयात्रा काढण्याची वेळ आल्याचं मत आध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांनी व्यक्त केलंय. ते नागपुरात पत्रकारांशी बोलत होते.



आजपासून ते पुढील तीन दिवस नागपूरच्या दौऱ्यावर आहेत. या दरम्यान ते महारुद्र पूजन, विज्ञान भैरव यांसारख्या शिबिरांमध्ये मार्गदर्शन करणार आहेत. शेतकरी, व्यापारी सर्वांना अध्यात्म आत्मबलाची गरज आहे, त्यासाठीच तीन दिवसांच्या शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचं मत त्यांनी व्यक्त केलंय.

सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे महारूद्र पूजन:- श्री श्री रविशंकर सोमनाथ ज्योतिर्लिंगचे महारुद्र पूजन करणार आहेत. ते सोमनाथ ज्योतिर्लिंगासोबत घेऊन आले आहेत. एक हजार वर्षांपूर्वी सोमनाथ ज्योतिर्लिंग उद्धवस्त झाले होते, त्याची पिंड लोक दक्षिण भारतात घेऊन गेलेले होते, ते पिंड आज नागपूरला आणण्यात आलेला आहे. सर्वसामान्य नागरिकांना सोमनाथ ज्योतिर्लिंगचे दर्शन घेता येईल. आध्यात्मिक मार्गावर चालावे आणि परमेश्वरावर विश्वास ठेवा, आत्महत्या सारखा निर्णय घेऊ नये, असे आवाहन श्री श्री रविशंकर यांनी केले आहे.

श्री श्री रविशंकर लवकरच सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची भेट घेणार आहेत. या संदर्भात ते म्हणालेत की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला यावर्षी १०० वर्षे पूर्ण होत आहेत, त्यामुळे मी आनंदित आहे. शिवाय सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांचा वाढदिवससुद्धा आहे, त्यामुळे भेट घेणार असल्याचं ते म्हणाले आहेत.

## हैदराबाद गॅझेटियरच्या जीआरबाबत सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानात उपोषण सुरू केलं होत. राज्यभरातून मोठ्या प्रमाणात मराठा समाज मुंबईत दाखल झाल्याने आंदोलनाकडे राज्याचे लक्ष लागले होते. तर, आंदोलकांची वाढती संख्या आणि आंदोलनाचा आक्रमकपणा पाहून सरकारवर मोठा दबाव निर्माण झाल्याने अखेर मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या मान्य केल्या. त्यानुसार, हैदराबाद गॅझेटियरचा शासन निर्णय जारी करण्यात आला असून आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याचाही जीआर निघाला आहे. हैदराबाद गॅझेटियरच्या शासन निर्णयाचा संदर्भ देत मराठवाड्यातील काही मराठा समाजाला कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मात्र, शासनाच्या या निर्णयाविरुद्ध ओबीसी समाज एकटवला असून ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनीही कोर्टात आव्हान देण्याचं म्हटलं आहे. आता, याप्रकरणी, सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात आलं आहे.

राज्य सरकारने काढलेल्या हैदराबाद गॅझेटियर शासन निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. आंदोलकांची बाजू ऐकल्याशिवाय निर्णय होऊ नये यासाठी ॲड. राज पाटील यांच्यावतीने हे कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. राज्य सरकारच्या २ सप्टेंबर रोजी काढण्यात आलेल्या जीआर(शासन निर्णया) ला कोणी आव्हान दिलं तर आमची बाजू ऐकल्याशिवाय निर्णय केला जाऊ नये, असे म्हणणे मांडत कॅव्हेट दाखल करण्यात आलं आहे. त्यामुळे, सरकारच्या जीआर विरोधात न्यायालयात याचिका दाखल झाल्यास आता आंदोलकांची बाजू देखील ऐकली जाणार आहे.

## संपादकीय ......

# अस्थिर नेपाळ

सर्वसामान्यांच्या अभिव्यक्तीचे नवे हत्यार ठरलेल्या समाजमाध्यमांचे दमन, नियंत्रण करून उरलेसुरले अधिकारही हिसकावून घेतले जात असल्याने नेपाळमध्ये तरुणाईने उद्रेक केला. विद्यमान ओली सरकार उलथवून टाकले. मंत्र्यांना सळो की पळो करून सोडले. या अत्यंत टोकाच्या हिंसक प्रतिक्रियेच्या मुळाशी कारणीभूत ठरलेला तेथील सत्ताधार्यांनी मांडलेला ष्टाचाराचा बाजार, त्यात भरडून निघालेली सर्वसामान्य जनता हा घटनाक्रम दुर्लक्षून चालणार नाही. सत्तेचा अंकुश जनतेच्या हाती असतो, हा धडा श्रीलंका, बांगला देशपाठोपाठ आता नेपाळच्या सत्ताधार्यांना तेथील सामान्य माणसाने शिकवला. राजसत्ता आणि सामान्य माणसातील संवादहीन वास्तवाच्या परिपाकाचे हे कटू फळ. नेपाळमध्ये अधूनमधून सरकार पडत असते आणि नव्या आघाड्या होऊन पुन्हा त्यात दुफळ्या माजत असतात; पण तेथे तरुणांनी केलेले आंदोलन मात्र अभूतपूर्वच! भ्रष्टाचाराचा अतिरेक, त्यात होरपळणारी सर्वसामान्य जनता आणि समाजमाध्यमांवर सरकारने घातलेल्या बंदीविरोधात तरुण वर्ग आक्रमक होऊन रस्त्यावर आला.संसदेवर हल्ला करून जाळपोळ आणि तोडफोड केली गेली. नेपाळच्या इतिहासात संसदेवर हल्ला होण्याची ही पहिलीच घटना. युवकांनी 'जेन झेड' बॅनरखाली निदर्शने केली. यावेळी लष्कराने केलेल्या गोळीबारात २० युवकांचा जीव गेला, तर ४०० हून अधिक जखमी झाले. काठमांडूसह ७ शहरांत संचारबंदी लागू केली असून, दिसताक्षणी गोळ्या घालण्याचे आदेश दिले आहेत. संतप्त आंदोलकांनी संसद भवनाला आग लावली. पंतप्रधान ओली, राष्ट्राध्यक्ष आणि गृहमंत्र्यांच्या खासगी निवासस्थानांची तोडफोड करून जाळपोळ केली. अर्थमंत्र्यांना काठमांडूमध्ये त्यांच्या घराच्या जवळ पाठलाग करून मारहाण केली गेली. आंदोलनाचे गांभीर्य लक्षात घेऊन पंतप्रधान केपी शर्मा ओली यांना अखेर राजीनामा द्यावा लागला. श्रीलंका आणि बांगला देशपाठोपाठ नेपाळमध्ये हे अराजक निर्माण झाले आहे. श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षांना देश सोडून पळून जावे लागले, तर बांगला देशच्या पंतप्रधान शेख हसीना यांना भारताच्या आश्रयाला यावे लागले होते. पाकिस्तानातही माजी पंतप्रधान इम्रान खान यांना तुरुंगात टाकून, लष्कराच्या बळावरच सध्याचे शाहबाज शरीफ यांचे सरकार कसेबसे तगून आहे.नेपाळमधील उद्रेकामागील कारणे वरकरणी न पटणारी वा अप्रस्तुत वाटत असली, तरी हा विषय किती टोकाला जाऊ शकतो आणि देशातील माणसाची अस्वस्थता त्यास कशी कारणीभूत ठरू शकते, याचे हे ढळढळीत उदाहरण नोंद घ्यायला लावणारे ठरले आहे. नेपाळ सरकारने फेसबुक, व्हॉटस्ॲप, एक्स, इन्स्टाग्राम आणि यूट्यूब यासह २६ समाजमाध्यमांवर बंदी घातली. या कंपन्यांनी निर्धारित मुदतीमध्ये दूरसंचार, माहिती-तंत्रज्ञान मंत्रालयाकडे नोंदणी न केल्यामुळे ही कारवाई केली गेली. समाजमाध्यमांवर बंदी घालताच हा मुक्त अभिव्यक्तीवरील हल्ला असून त्याचे रूपांतर सेन्सॉरशिपमध्ये होईल, अशी भीती तेथील तरुणांमध्ये निर्माण झाली.विशेष म्हणजे, पंतप्रधान ओली यांनी समाजमाध्यमांवरील बंदी उठवण्यास स्पष्टपणे नकार दिला होता. त्याचे तीव्र पडसाद उमटले. तरुणाईत संतापाची लाट पसरली. समाजमाध्यमांवरील बंदीमुळे शिक्षण तसेच व्यवसायांना फटका बसत असल्याचे नेपाळच्या 'कम्प्युटर असोसिएशन'ने म्हटले होते. नागरिकांचे दैनंदिन व्यवहारही विस्कळीत होत असून यातून नेपाळ जागतिक स्तरावर मागे पडण्याचा धोका असल्याची भीती औद्योगिक संघटनांनीही व्यक्त केली होती. सरकारने असा निर्णय घेण्यापूर्वी व्यावहारिक तोडगा काढण्यासाठी संबंधितांशी पुरेशी चर्चा करायला हवी होती. आता उशिरा का होईना, नेपाळ सरकारला याची जाणीव झाल्याचे दिसते. समाजमाध्यमांची ताकद विलक्षण आहे. यापूर्वीही २०१० मध्ये ट्युनिशियामध्ये असंतोषाची ठिणगी पडली आणि या छोट्या देशातील नागरिक रस्त्यावर उतरले. त्यानंतर हा वणवा मध्यपूर्वेतील विविध अरब देशांत झपाट्याने पसरला व मोठ्या संख्येने अरब लोक ठिकठिकाणी राज्यकर्त्यांविरोधात हिंसक व अहिंसक पद्धतीने निदर्शने करू लागले.समाजमाध्यमांची नव्याने साथ लाभलेला हा जनरेटा इतका प्रभावी ठरला की, ट्युनिशियापाठोपाठ इजिप्तमधील सर्वेसर्वा होस्नी मुबारक यांना दि. ११ फेब्रुवारी २०११ रोजी पायउतार व्हावे लागले. लिबिया, बहारिन, जॉर्डन, येमेन, सौदी अरेबिया, सीरिया, सुदान, मोरोक्को या देशांत सत्ताधार्यांच्या एकाधिकारशाही व जुलुमाविरोधात समाजमाध्यमांवरून नाराजी प्रकट होऊ लागली आणि त्याचे रूपांतर सामाजिक उद्रेकात झाले. दि. १७ सप्टेंबर २०११ रोजी न्यूयॉर्क येथील वित्तीय केंद्र असलेल्या झुकोटी पार्क येथे आर्थिक समस्यांनी ग्रस्त अशा अमेरिकेतील काही युवकांनी धरणे धरले. 'ऑक्युपाय वॉल स्ट्रीट' म्हणून गाजलेल्या त्या आंदोलनाला समाजमाध्यमांवर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. त्यानंतर अमेरिकेतील १०० शहरांमध्ये वेगाने हे आंदोलन पसरले.या सर्व पार्श्वभूमीवर नेपाळमध्ये केवळ समाजमाध्यमांवरील निर्बंधांमुळे हे आंदोलन सुरू झालेले नाही, तर देशातील भ्रष्टाचार वाढल्याबद्दलचा रागही जनतेत आहे. ओली सरकार आर्थिक आघाडीवर साफ अपयशी ठरले. नवा रोजगार निर्माण होत नसून, बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आहे. भ्रष्टाचार रोखण्यात सरकारला पूर्ण अपयश आल्याचे माजी वित्त सचिव रामेश्वर खनल यांनीही म्हटले होते. देशात ओली, पुष्पा कमल दहल प्रचंड व शेरबहादूर देउबा यांच्याकडे आलटून-पालटून सत्ता येत-जात राहिली आहे. सर्वच सत्ताधार्यांवर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप झाले आहेत. नेपाळला प्रजासत्ताक बनवण्याचा प्रयोग अयशस्वी ठरला असून, पुन्हा राजेशाही आणावी, या मागणीसाठी गेल्या मार्चमध्ये देशव्यापी निदर्शनेही झाली.

# अमरावती महानगरपालिका शिक्षकांचा झाला सन्मान

## मनपा आदर्श शाळा, आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० अमरावती** – अमरावती महानगरपालिका शिक्षण विभाग द्वारा श्रीमती सौम्या शर्मा आयुक्त मनपा यांच्या मार्ग दर्शनात दि. ९ सप्टेंबर रोजी क्षितिज मंगल कार्यालय येथे शिक्षण दिन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात अमरावती महानगरपालिका सन २०२५ २६ मधील आदर्श शाळा पुरस्कार, मराठी माध्यम मनपा उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा जेवड, उर्दू माध्यम मनपा उर्दू उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा क्रमांक ९ नूर नगर,आदर्श शाळा प्रोत्साहन पर बक्षीस मनपा मराठी शाळा क्रमांक १५ एस आर पी एफ कॅम्प, मनपा उच्च प्राथमिक उर्दू शाळा कॅम्प टीव्ही हॉस्पिटल जवळ यांना देण्यात आला.आदर्श शिक्षक पुरस्कार मध्ये सावित्रीबाई फुले आदर्श पुरस्कार मनपा मराठी शाळा क्रमांक १४ च्या सहाय्यक शिक्षिका कु. चेतना बोंडे, आदर्श शिक्षक पुरस्कार कु. सीमा सहेर शेख अफजल , डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शिक्षक पुरस्कार अझर उल्ला खान मनपा मराठी कन्या शाळा क्रमांक ३ बडनेरा, तसेच मेजर ध्यानचंद क्रीडा शिक्षक पुरस्कार उर्दू शाळा क्रमांक ८ श्री अनवर मुरसलीन, प्रोत्साहन पर उत्कृष्ट कार्य करणारे शिक्षक कु नाझीमा तहसीम उर्दू आय एम एस शाळा यांना देण्यात आला.तसेच इयत्ता दहावी व बारावी मध्ये ८० टक्के पेक्षा जास्त विद्यार्थी पास आहे अशा नउ शाळांचा सत्कार, तसेच शिष्यवृत्ती परीक्षा एन एम एम एस परीक्षा यामध्ये ७५ टक्के पेक्षा जास्त विद्यार्थी पास आहेत अशा शिक्षकांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला सेवानिवृत्त मुख्याध्यापक व शिक्षक यांचा सत्कार, तसेच ज्या विद्यार्थ्यांनी अतिशय चांगले वक्तृत्व सादर केले अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून श्रीमती शिल्पा नाईक अतिरिक्त आयुक्त,म. न. पा प्रमुख अतिथी श्रीमती मेघना वासणकर उपायुक्त मनपा,श्याम सुंदर देव मुख्य लेखा परीक्षक,दत्तात्रय फिस्के मुख्य लेखा धिकारी, अमित डेंगरे सिस्टम मॅनेजर, नंदकिशोर तिखीले सहा.आयुक्त, सचिन बोन्द्रे पशु वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमचे प्रास्ताविक डॉ. प्रकाश मेश्राम शिक्षणाधिकारी यांनी केले. कार्यक्रमाँचे सूत्र संचालन श्रीमती प्रियांका हंबर्डे, श्रीमती प्रणाली ठाकरे यांनी केले. आभार प्रदर्शन पंकजकुमार सपकाळ सकाअ यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी तेकरीता श्रीमती लिना आकोलकर अधिक्षक,वहीद खान, योगेश पखाले, श्रीमती ज्योती बन्सोड, जावेद खान शाळा निरीक्षक, प्रविण ठाकरे क्रिडा निरीक्षक,योगेश राणे, संजय बेलसरे, निमामुददीन काझी, सुषमा दुधे, शुभांगी सुने विषय तज्ञ, धिरज सावरकर, दिपाली थोरात, अतुल बोबडे, कैलास कुलट, उज्वल जाधव, सोनिया पवार, भारती मालखेडे, पुनम कणेर, वैशाली सोळंके, विशाल वालचाळे, गिरीष लाकडे यांनी परीश्रम घेतले,




## मधुमेहाचा नवा प्रकार

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

चेन्नईतील मद्रास डायबिटीज रिसर्च फाऊंडेशन म्हणजेच एमडीआरएफ आणि अमेरिकेतील वॉशिंग्टन युनिव्हर्सिटी यांनी नुकत्याच केलेल्या संयुक्त संशोधनात डायबिटीजचा एक नवा प्रकार उघडकीस आला आहे.

आतापर्यंत टाईप १, टाईप २ किंवा गर्भावस्थेतील डायबिटीज या प्रचलित स्वरूपांबरोबरच मुलांमध्ये आणि तरुणांमध्ये होणार्या आनुवंशिक स्वरूपाला मोडी म्हणजेच 'मॅच्युरिटी ऑनसेट डायबिटीज ऑफ द यंग' असे नाव दिले जाते. या मोडी डायबिटीजचा अजून एक विशिष्ट प्रकार संशोधकांच्या नजरेस आला असून तो एबीसीसी ८ नावाच्या जनुकामधील बदलाशी निगडित आहे.

या संशोधनात असे दिसून आले की, एबीसीसी८ जीन हा पॅन्क्रियाजमधील इन्सुलिन निर्माण करणार्या बीटा पेशींसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या जीनमध्ये झालेला बदल म्हणजेच म्युटेशन सुरुवातीला मुलांमध्ये किंवा नवजातांमध्ये लो शुगर म्हणजेच जन्मजात हायपरइन्सुलिनिझमचे लक्षण निर्माण करतो. अशा मुलांना सुरुवातीला सतत कमी साखरेच्या त्रासाला सामोरे जावे लागते; परंतु जसजसे वय वाढते तसतसे या मुलांमध्ये उलट परिस्थिति निर्माण होते आणि पुढे जाऊन त्यांना डायबिटीजचा त्रास सुरू होतो. त्यामुळे एकाच जीनमधील वेगवेगळ्या प्रकारच्या बदलांमुळे शरीरात कधी जास्त इन्सुलिन तयार होऊन हायपोग्लायसेमिया म्हणजे कमी साखर निर्माण होते, तर कधी कमी इन्सुलिन तयार होऊन डायबिटीज म्हणजेच जास्त साखरेचा आजार उद्भवतो.

या अभ्यासातून हे स्पष्ट झाले की, सर्व मोडी रुग्णांना एकसारखा उपचार देता येत नाही. कारण, प्रत्येक प्रकाराच्या जीन म्युटेशननुसार औषधांचा परिणाम वेगळा होतो. उदाहरणार्थ, या नव्याने सापडलेल्या प्रकारात सल्फोनिल्युरिया गटातील औषधांचा काहीही उपयोग होत नाही, तर इतर प्रकारांत हीच औषधे प्रभावी ठरतात.



त्यामुळे योग्य निदानासाठी आणि अचूक उपचार पद्धती ठरवण्यासाठी जेनेटिक तपासण्या आणि प्रयोगशाळा चाचण्या करणे आवश्यक आहे.

सध्या या प्रकारच्या डायबिटीजला थांबवण्यासाठी किंवा पूर्णपणे बरे करण्यासाठी कोणतेही औषध किंवा उपाय उपलब्ध नाहीत. कारण, तो जनुकांमधील दोषामुळे जन्मतःच होतो; मात्र कुटुंबात ही समस्या आधीपासून असल्यास किंवा मुलांमध्ये वारंवार लो शुगरची लक्षणे दिसल्यास वेळेत तपासणी करून निदान करणे शक्य आहे. त्यानंतर योग्य वैद्यकीय देखरेख व उपचार सुरू करता येतात. संशोधकांचे मत आहे की, आज कॅन्सरमध्ये प्रत्येक रुग्णाच्या पेशींतील आण्विक बदल लक्षात घेऊन वैयक्तिकृत उपचार केले जातात, तसेच डायबिटीजमध्येही आता 'प्रिसिजन मेडिसिन' म्हणजेच वैयक्तिक उपचार पद्धतीची गरज आहे. हा नवा अभ्यास डायबिटीज उपचाराच्या त्याच दिशेने टाकलेले पहिले आणि महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# कांदा पिकावर काळा करपा रोगाचा प्रादुर्भाव, असा करा बंदोबस्त

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

काळा करपा जो एक बुरशीजन्य रोग आहे, कांद्यावरील पानांवर आणि खोडांवर काळे डाग तयार करतो. या रोगामुळे पाने करपतात, कांदा पीक कमकुवत होते, त्यामुळे साहजिकच उत्पादनात घट होते.

काळा करपा रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी पिकांची योग्य काळजी घेणे, प्रमाणित बियाणे वापरणे आणि आवश्यकतेनुसार बुरशीनाशकांची फवारणी करणे महत्त्वाचे आहे.

त्यामुळे अशी लक्षणे दिसल्यास नेमक्या काय उपाययोजना कराव्यात.

**काळा करपा (पीळ)**

सतत तीन दिवस पाऊस, ८५ टक्क्यांपेक्षा अधिक सापेक्ष आर्द्रता आणि ढगाळ वातावरण असल्यास काळा करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते.

तो टाळण्यासाठी अतिरिक्त पाण्याचा निचरा योग्य रीतीने होत असल्याची खात्री करावी.

या रोगाच्या प्रतिबंधासाठी कार्बेडाझिम (५० डब्ल्यूपी) १ ग्रॅम किंवा ट्रायसायक्लॅझोल (७५ डब्ल्यूपी) १ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे पानांवर फवारणी करावी.

गरजेनुसार पुढील फवारणी १५ दिवसांच्या अंतराने, मँकोझेब (७५ डब्ल्यूपी) २.५ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे करावी.

(नाशिक जिल्ह्यात ह्यात जोरदार पावसाचा अंदाज लक्षात घेता वरील सर्व कामे प्रसारित केलेल्या दिवसाकरिता स्थगित कराव्यात किंवा पुढील चार दिवस पुढे ढकलावीत.)

– ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी.




शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# सी. पी राधाकृष्णन उपराष्ट्रपती पदाची प्रतिष्ठा आणखी वृद्धिंगत करतील

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून राज्यपाल राधाकृष्णन यांना शुभेच्छा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१० मुंबई**

'भारताचे १५ वे उपराष्ट्रपती म्हणून सी. पी राधाकृष्णन या पदाची प्रतिष्ठा आणखी वृद्धिंगत करतील, असा विश्वास व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांनी भारताचे नवनिर्वाचित उपराष्ट्रपती आणि महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे अभिनंदन केले आहे.

श्री. राधाकृष्णन यांच्या विजयाची घोषणा होत असताना त्यांचा उल्लेख मुंबईचे, महाराष्ट्राचे म्हणून केला गेला. त्याअर्थाने महाराष्ट्राची एक व्यक्ती या पदावर आसिन झाली याचा मला अतिशय आनंद आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवर्जून नमूद केले.



शुभेच्छा संदेशात मुख्यमंत्री म्हणतात, ' श्री. राधाकृष्णन यांचे जीवन सेवा, समर्पण आणि राष्ट्रहिताप्रती निष्ठेचे प्रतीक आहे. त्यांचे शिक्षण, सामाजिक उत्थान आणि सुशासनातील योगदान प्रेरणादायी आहे. राधाकृष्णन यांचा अनुभव आणि दूरदृष्टीचा अनेकांना लाभ होईल. त्यातून भारत नवी उंची गाठेल आणि जागतिक स्तरावर सशक्त स्थान प्राप्त करेल. महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून आजवर राधाकृष्णन यांनी केलेले मार्गदर्शन अमूल्य राहीले आहे. यापुढेही श्री. राधाकृष्णन यांचा प्रवास लोककल्याणकारी आणि यशस्वी ठरावी, अशी मनोकामना व्यक्त करून, मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# महाराष्ट्रासह तामिळनाडू, केरळ आणि पंजाब राज्यातील खासदार संशयाच्या भोवऱ्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०नवी दिल्ली–** उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत विरोधी पक्षातील १५ खासदारांनी क्रॉस व्होटिंग केल्याचा दावा भाजपने केला आहे. इंडिया आघाडीचे उमेदवार निवृत्त न्यायमूर्ती बी. सुद्रशन रेड्डी यांना फक्त ३०० मते मिळाली आहेत. त्यांना ३१५ मते मिळतील असा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी केला होता. त्यांचे म्हणणे फोल ठरले हे आता सदर निवडणुकीच्या निकालातून दिसून आले आहे. महाराष्ट्र, तामिळनाडू, केरळ आणि पंजाब येथील खासदारांनी क्रॉस व्होटिंग केल्याचा संशय आहे. भाजपने यासाठी तयारी केली होती, असे बोलले जाते.भाजपच्या आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी एक्स प्लॅटफॉर्मवर लिहिले आहे की, विरोधकांच्या सर्व ३१५ खासदारांनी मतदान केले पण ते कुणासाठी केले हा खरा प्रश्न आहे.

इतकी घोषणाबाजी करूनदेखील इंडिया आघाडीच्या उमेदवाराला फक्त ३०० मते मिळाली. जयराम रमेश यांनी आणखी १५ मते मिळतील असा जो दावा केला होता तो मते कुठे गेली? विरोधकांनी एकजुटीचे केलेले दावे व वास्तव यातील फरक स्पष्ट झाला आहे. १५ खासदारांनी क्रॉस व्होटिंग केले तसेच आणखी १५ खासदारांची मते अवैध ठरवली गेली म्हणजेच त्यांनी चुकीच्या पद्धतीने मतदान केल्यामुळे ती मते अमान्य ठरली. काँग्रेसचे खासदार शक्ती सिंह गोहिल यांनी स्पष्ट केलं की, विरोधी पक्षातील १५ मते दुर्दैवाने अवैध ठरली आणि आम्हाला फक्त ३०० मते मिळाली.




### कोणत्या खासदारांनी क्रॉस व्होटिंग केली?

महाराष्ट्र, तामिळनाडू, केरळ आणि पंजाब येथील खासदारांनी क्रॉस व्होटिंग केल्याचा संशय आहे. भाजपने यासाठी खास तयारी केली होती, असे बोलले जात आहे. महाराष्ट्रातील काही खासदार अलीकडे एनडीएबाबत सकारात्मक बोलत होते. त्यामुळे त्यांच्या नावांची चर्चा येत्या काळात होईलच तसेच केरळ, पंजाब व इतर राज्यांतील काही नेते आपल्या पक्षाविरोधात उघडपणे बोलताना दिसले होते.मतदान गुप्त स्वरूपाचं असतं, त्यामुळे कुणी क्रॉस व्होटिंग केलं किंवा चुकीचं मतदान केलं याचा थेट पुरावा मिळणं कठीण आहे. उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत संख्याशक्तीपेक्षा राजकीय गणित, नाराजी आणि अंतर्गत गोंधळ यांचा मोठा प्रभाव दिसून आला.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १० सप्टेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# शिक्षकांनी सर्वोत्तम आदर्श आचरण ठेवावे

## -विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

प्रत्येक विद्यार्थी हा शिक्षकांमुळे घडतो. शिक्षकांच्या वर्तनाचा विद्यार्थ्यांवर खोलवर परिणाम पडतो. त्यामुळे शिक्षकांनी सर्वोत्तम आदर्श आचरण ठेवावे, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी केले.

जिल्हा नियोजन सभागृहात जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. मिलींद कुबडे, प्राथमिक शिक्षणाधिकारी सतिश मुगल, डायटचे अधिव्याख्याता प्रविण राठोड आदी उपस्थित होते.



डॉ. सिंघल यांनी शिक्षकांना पिढी घडविण्याची संधी दिली आहे. त्यामुळे शिक्षकांनी त्यांच्या कामावर लक्ष्य केंद्रीत करून शिक्षण देण्याचा आनंद घ्यावा. शाळेचा आत्मा हा शिक्षक आहे. नवीन पिढी घडविण्याचे काम शिक्षकामुळे होत आहे. त्यामुळे शिक्षकांना मिळालेल्या या संधीचे सोने करावे. तसेच विद्यार्थ्यांना अभिमान वाटेल, अशी वागणूक ठेवावी. इंग्रजी माध्यमांच्या शाळांशी जिल्हा परिषद शाळांची स्पर्धा असल्याने शाळांनी इंग्रजीवर भर द्यावा. यासाठी नाविण्यपूर्ण उपक्रम राबवावे, तसेच डिजीटल शाळांचा उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले.

श्रीमती महापात्र यांनी पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन केले. शिक्षकांनी येत्या काळात चांगले कार्य करून आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी प्रवेशिका पाठवाव्यात, असे आवाहन केले. यावेळी डॉ. कुबडे यांनी मार्गदर्शन केले. श्री. मुगल यांनी प्रास्ताविक केले. पुरस्कार प्राप्त शिक्षक गजानन काकडे, वनिता बोरोडे, श्री. विरेंद्र यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा २, जिल्हास्तरीय पुरस्कार, शिष्यवृत्ती परिक्षा, निपून महाराष्ट्र पुरस्काराचे वितरण करण्यात आले. अंकुश गावंडे आणि विद्यार्थ्यांनी अलेक्साचे प्रात्यक्षिक सादर केले.

# महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन नवे उपराष्ट्रपती!

## निकाल जाहीर, एनडीएला जादा मते मिळाली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नवी दिल्ली**

जगदीप धनखड यांनी अधिवेशनकाळातच अचानक राजीनामा दिल्याने उपराष्ट्रपतीपदासाठी आज मतदान झाले आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे महाराष्ट्राचे राज्यपाल सीपी राधाकृष्णन हे विजयी झाल्याची घोषणा करण्यात आली आहे. इंडिया आघाडीकडून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश बी सुदर्शन रेड्डी हे उमेदवार होते.

एकूण मतदान ७६८ झाले होते, परंतू १५ मते अवैध ठरली आहेत. सीपी राधाकृष्णन यांना ४५२ मते मिळाली आहेत. तर बी सुदर्शन रेड्डी यांना ३०० मते मिळाली आहेत.




एनडीएची मते वाढल्याने इंडिया आघाडीला मोठा सुरुंग लागला आहे. लोकसभा आणि राज्यसभेचे मिळून ७८८ खासदार असतात. यापैकी ७ जागा रिक्त आहेत. तर १३ खासदारांनी मतदान केलेले नाही. एकूण ७८१ मतदान होणे अपेक्षित होते. परंतू, १३ मते पडलेली नाहीत. यामुळे आता ७६८ मतांची मोजणी केली जाणार आहे. मतदान न करणाऱ्यामध्ये बीआरएसचे ४, बीजेडीचे ७, अकाली दलाचे १ आणि अपक्ष १ अशा खासदारांचा समावेश आहे. एनडीएच्या ४२७ खासदारांनी मतदान केले आहे.

# ‘पीएम किसान’ योजनेचा लाभ आता केवळ पत्नीलाच

## केंद्र सरकारकडून नियमात बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती-**




पंतप्रधान किसान सन्मान निधी म्हणजेच पीएम-किसान योजनेत केंद्र सरकारने नवा नियम लागू केला आहे. त्यानुसार पती-पत्नी अशा दोघांच्या नावे शेतजमीन असेल, तर या योजनेचा लाभ आता फक्त पत्नीलाच दिला जाणार आहे.या योजनेंतर्गत सहा हजार रुपये वार्षिक निधी शेतकऱ्यांना दिला जातो. तथापि, केंद्राने नियम कडक करून पत्नीलाच हा लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. पीएम-किसान योजनेचा २० वा हप्ता २ ऑगस्ट २०२५ रोजी वितरित करण्यात आला आणि राज्यातील ९२ लाख ९१ हजार शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घेतला. मात्र, नव्या नियमामुळे सुमारे साठ हजार लाभार्थ्यांचे पैसे रोखले गेले आहेत.

### कुटुंबातील एकालाच लाभ

नव्या नियमानुसार, या योजनेचा लाभ पती, पत्नी आणि त्यांची १८ वर्षांखालील मुले अशा चौघांपैकी एकालाच घेता येईल. पती-पत्नीच्या नावावर शेतजमीन असेल, तर पतीचा हप्ता बंद करून पत्नीचा सुरू ठेवला आहे. मुलगा-मुलगी यांनाही स्वतंत्र हप्ता यापुढे दिला जाणार नाही.

# बिल आहे की काय हो..

## वाढलेल्या बिलामुळे स्मार्ट मीटरविरूद्ध ग्रामीण भागात असंतोष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०परतवाडा**



:- विद्युत वितरण कंपनीतर्फे ग्रामीण भागात स्मार्ट मीटर लावले जात आहेत. लावण्यात आलेल्या मीटरमुळे नागरिकांना अव्वाच्या सव्वा देयके येत असल्याने गोरगरीब नागरिक हैराण झाले आहेत. यासंदर्भात चमक बु, चमक खुर्द व देवरी येथील नागरिक विद्युत वितरण कंपनीवर धडकले. त्यांनी लावलेले मीटर काढण्याची मागणी कार्यकारी अभियंता यांना केली.

चमक खुर्द, चमक बुद्रुक, देवरी येथील घरांमध्ये जबरदस्तीने स्मार्ट मीटर लावण्यात आल्याचा गंभीर आरोप करीत नागरिकांनी अचलपूर येथील विद्युत वितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे यांना भेटून निवेदन दिले. स्मार्ट मीटर लावल्यामुळे अव्वाच्या सव्वा देयके येत आहेत. मजुरी करणाऱ्या गरिबांना आर्थिक बोजा बसत असल्याने तत्काळ ते स्मार्ट मीटर काढण्यात यावे अन्यथा आंदोलनाचा इशारा सरपंच पांडुरंग सोळंके, उपसरपंच उमेश रमेश ईखे, ग्रामपंचायत सदस्य अभिनव आगे, सदस्य सुनील मोरे, संदीप बरडे, दीपक पाटील, मयुर निकम, अमोल धर्माळे, दता महानकर, देविल जागळे, मंगेश देशमुख, प्रदीप पाटील, चंद्रशेखर आखुळ, सागर काटोले, देवेंद्र सांतंगे, नरेंद्र सांतगे व विलास पाटील यांनी दिला.

### स्मार्ट मिटर काढण्याचा ग्रामसभेत घेतला ठराव

सर्वसाधारण ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. कोरम पूर्ण असल्याने सभेचे अध्यक्ष सरपंच गणपत सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली सभेत ग्रामपंचायत चमक बु चमक बुव देवरी गावामध्ये लावण्यात आलेले स्मार्ट मिटर काढण्यात तसेच चमक बु व देवरी गावमध्ये काही प्रमाणात जुने मिटर बदलून न लावले आहेत तसेच शिल्लक कुटुबांना अजुनही स्मार्ट मिटर लावण काम चालू आहे. ती तात्काळ थांबवण्याची मागणी करण्यात आली आहे.

# वोट चोर गद्दी छोडच्या नारेबाजीसह राहुल गांधींच्या समर्थनार्थ युवक काँग्रेसचे स्वाक्षरी अभियान

## अमरावती विधानसभा युवक काँग्रेसचा अभिनव उपक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती,**

सध्याच्या सत्ताधाऱ्यांच्या संविधानविरोधी कारभाराच्या विरोधात युवक काँग्रेसतर्फे आज वोट चोर गद्दी छोड अशा घोषणांनी गगनभेदी नारे देत स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. हे अभियान डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती येथे आयोजित करण्यात आले.

या अभियानात शेकडो विद्यार्थी आणि युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपला रोष व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी स्वाक्षऱ्या करून लोकशाहीची पायाभरणी मजबूत करण्यासाठी आणि जनादेशाचा अपमान करणाऱ्या सत्ताधाऱ्यांविरुद्ध ठाम भूमिका घेतली.

जनतेच्या मतांचा अनादर करून सत्तेत बसलेल्या सरकारविरुद्ध युवकांचा संघर्ष सुरू असून, या स्वाक्षरी अभियानाद्वारे लोकशाहीची खरी ताकद दाखविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद पाहता, युवक काँग्रेसचे हे अभियान पुढील काही दिवस शहरातील महाविद्यालये, बाजारपेठा व सार्वजनिक ठिकाणी राबविले जाणार असल्याचे अमरावती विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष वैभव देशमुख यांनी सांगितले. या वेळी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रवक्ते व अमरावती जिल्हा युवक काँग्रेसचे प्रभारी कपिल ढोके, शहर जिल्हाध्यक्ष निलेश गुहे, उपाध्यक्ष अनिकेत ढेंगळे, नितीन काळे, पंकज मांडळे, स्वप्नील साव, अक्षय साबळे, संकेत साहू, आकाश गेडाम, आकाश धुराटकर, धनंजय बोबडे, अंकुश टोपले, मोहीत भेंडे, ड. अफरोज पठाण, शुभम बांबल, शुभम हिवसे, चैतन्य गायकवाड, श्रेयस धर्माळे, संकेत भेंडे, केदार भेंडे, कृणाल गावंडे, सौरभ तायडे, प्रियल मोहोड, सुरज खैरे, अनिकेत क्षीरसागर, प्रथमेश गावंडे, अविनाश भोसले, साहिल वानरे, निशांत पवार, शिवानंद भोंगाडे या युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांसह खालील महाविद्यालयीन विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते:

# सोयाबीनवरील रोगामुळे शेतकरी संकटात

## तिवसा भाजप व शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० तिवसा-** तिवसा तालुक्यातील शेतकरी सध्या सोयाबीन पिकावर आलेल्या येलो मोझॅक या रोगामुळे मोठ्या संकटात सापडले आहेत. या रोगामुळे पिके पिवळी पडत असून भाजून जात आहेत, परिणामी उत्पादनावर गंभीर परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांना कोणतीही हमी राहिलेली नाही.या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी तिवसा तालुका आणि स्थानिक शेतकरी बांधवांच्या वतीने तहसीलदार आणि कृषी अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात सोयाबीन पिकाचे सरसकट पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, तसेच पीकविमा कंपन्यांनी तात्काळ पंचनामे करून विमा मंजूर करावा, अशी मागणी करण्यात आली.या वेळी उपस्थित असलेल्यांमध्ये -तालुका अध्यक्ष सागर सिंगाने, तिवसा शहर अध्यक्ष अजय भाऊ गुल्हाने, किसान मोर्चा तालुका अध्यक्ष विजयराव घोगरे, तालुका सरचिटणीस गजानन राऊत, युवा मोर्चा अध्यक्ष शुभम राऊत, तालुका उपाध्यक्ष प्रवीण बडकस, डॉक्टर सेल जिल्हा अध्यक्ष डॉ. राजेंद्र पालिवाल (राजस्थान), प्रकोष्ठ सेल जिल्हा अध्यक्ष संजय भाऊ चांडक, सचिव गोवर्धन इजापुरे, तसेच अंकुश देशमुख, अनिकेत वानखडे, सुमित अनासने, प्रतीक नंदनवार, यश चर्जन, पंकज वानखडे, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, मंगेश नागपुरे, सतीश नंदणवार, वैभव भोंबे, गोपाल अळसपुरे, राजाभाऊ टेकाडे, गौरव वानखडे, विजय बाणते, सुरज तवर, प्रथमेश गौरखेडे, सुरज गौरखेडे, हेमंत चिचाटे, गौरव घुरड यांचा समावेश होता.

# जिल्ह्यात श्रीगणेशा आरोग्याचा उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ३०८ आरोग्य शिबिरातून १६ हजार २१९ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

## ५८३ नागरिकांनी केले रक्तदान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती-** ,

७गणेशोत्सावाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या ‘श्रीगणेशा आरोग्याचा’ या विशेष उपक्रमाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे हजारो नागरिकांना मोफत आरोग्यसेवेचा लाभ मिळाला.या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील गणेश मंडळांच्या ठिकाणी आरोग्य तपासणी व उपचार शिबिरांचे आयोजन करण्यात आले. हा विशेष उपक्रम जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनात निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, अधीक्षक डॉ. निलेश खटके, धर्मदाय सह आयुक्त दीपक खोचे, धर्मदाय उपायुक्त राजेश इंगोले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दीपक आसोले, सुपरस्पेशालिटी हॉस्पीटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे, महापालिका वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाल काळे तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे अध्यक्ष डॉ. श्याम गावंडे, कर्मचारी पवन गुल्हाने व मंगेश बांबटकर यांच्या प्रत्यक्ष सहभागाने प्रभावीपणे राबविण्यात आला.या उपक्रमांतर्गत जिल्ह्यात एकूण ३०८ आरोग्य शिबिरे घेण्यात आली. या शिबिरांमधून १६ हजार २१९ नागरिकांना आरोग्य तपासणी व उपचाराचा लाभ मिळाला. या शिबिरात ७ हजार ९१५ पुरुष, ७ हजार ३८० महिला व ९२४ बालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या उपक्रमादरम्यान ५८३ नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक उत्तरदायित्वाचे सुंदर उदाहरण दिले.यासोबतच विविध सामाजिक संस्थांनी देखील आरोग्य विषयक जनजागृतीसाठी सहभाग नोंदवला. ‘अनुलोम’ संस्थेने जिल्ह्यातील १४ तालुक्यातील ग्रामीण भागात १३० गणेशोत्सव मंडळांना भेट देऊन ९,१०० नागरिकांमध्ये आरोग्य विषयक बाबी संदर्भात जनजागृती केली.

अशाप्रकारे श्रीगणेशा आरोग्याचा या विशेष उपक्रमाच्या माध्यमातून एकूण ४३८ आरोग्य उपक्रम व जनजागृती कार्यक्रम आयोजित करून २५,३१९ नागरिकांपर्यंत आरोग्य विषयक जनजागृती पोहोचविण्यात आली, तर यापैकी १६,२१९ नागरिकांना प्रत्यक्ष आरोग्य सेवेचा लाभ देण्यात आला.’श्रीगणेशा आरोग्याचा’ उपक्रमाला जिल्ह्यातील नागरिक व सामाजिक संस्थांकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा आरोग्य जनजागृती व सेवा क्षेत्रातील एक उल्लेखनीय बाब ठरली आहे. समाजातील गोर-गरीब नागरिकांना व रुग्णांना आरोग्य तपासणी व वैद्यकीय उपचार एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावेत, या उदात्त हेतूने हा उपक्रम जिल्ह्यात राबविण्यात आला.

# सुशिक्षित बेरोजगारांना शेतकऱ्यांचा ई-पीक पेरा ऑनलाईन नोंदणी करण्याची कामे द्या !

## ई-पीक पेरा ऑनलाईन नोंदणी शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी !

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मोर्शी-** राज्य शासनाच्या कृषी विभागाने शेतकऱ्यांसाठी पीक पेरा ऑनलाईन नोंदणी करण्यासंदर्भात ई-पीक पेरा पाहणी नवीन प विकसित करून कार्यान्वित केले आहे; परंतु अनेक शेतकऱ्यांना मोबाईल हाताळता येत नाही.

७५ टक्के शेतकऱ्यांजवळ स्वत:चा अँड्रॉईड मोबाईल नाही. काही भागात नेटवर्क, सर्व्हर डाऊनच्या समस्या आ वासून उभ्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना ई-पीक पेरा ऑनलाईन नोंदणी करणे अडचणीचे झाले आहे.

हे टाळण्यासाठी शासनाने तलाठ्यामार्फत गावातील सुशिक्षित बेरोजगारांना मानधनावर स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून त्यांना ई-पीक पेरा ऑनलाईन नोंदणी करण्याचे काम द्यावे, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन देऊन केली आहे.

ई-पीक पाहणी नोंदणी ही अनेक शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरली आहे, कारण पमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी, जसे की प अचानक बंद पडणे, ओटीपी (OTP) न येणे, माहिती भरण्याची प्रक्रिया संथ होणे आणि नोंदणी अर्धवट राहणे, यांमुळे शेतकरी त्रस्त आहेत. या अडचणींमुळे शेतकऱ्यांना पीक विमा, नुकसान भरपाई आणि हमीभाव खरेदीसारख्या सरकारी लाभांपासून वंचित राहावे लागण्याची भीती आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास अचूक भरपाई आणि योग्यप्रकारे मदत करणे शक्य व्हावे, पिकाची माहिती संकलित करताना पारदर्शकता यावी या हेतूने राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी ई-पीक पेरा नोंदणी करण्यासाठी ई-पीक पाहणी प विकसित करून कार्यान्वित केली आहे. खरीप हंगाम २०२५ साठी पीक पाहणीची शेतकरी स्तरावरील नोंदणी १ ऑगस्ट २०२५ ते १४ सप्टेंबर २०२५ चा कालावधी निश्चित केला असून पिक पेरा नोंदणी करण्याचा कालावधी संपत आलेला असून आजही हजारो शेतकऱ्यांचा पीक पेरा भरायचा शिल्लक असल्यामुळे पडीक क्षेत्राची माहिती, बांधावरील झाडांची माहिती कशी भरावी असा प्रश्न निर्माण झाला आहे.

सुशिक्षित अनुभवीसाठी ही पद्धत सोयीची असली तरी ७५ टक्के शेतकऱ्यांसाठी ई-पीक पाहणी या पच्या माध्यमातून ई-पीक पेरा नोंदणी करणे पूर्णत: अडचणीचे आहे. त्यासाठी शासनाने गावातील तलाठ्यामार्फत सुशिक्षित बेरोजगारांना संधी देऊन एक स्वतंत्र यंत्रणा पथक तयार करून त्यांना शेतकऱ्यांच्या ई-पीक पेरा ऑनलाईन नोंदणी करण्याची कामे द्यावी तसेच सर्व्हर डाउन होणे, शेतकऱ्यांमध्ये अपुरी जागृती आणि तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांची पीक पेरा नोंदणी झालेली नसुन पिक पेरा नोंदणी साठी मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष रुपेश वाळके यांच्या तर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे करण्यात आली आहे.

### शेतकऱ्यांसमोर या येत आहेत अडचणी!

ऑनलाईन नोंदणी न केल्यास ७/१२ मधील पीक पेरा कोरा राहील. त्यामुळे कोणतीही शासकीय मदत मिळणार नाही असे नमूद करण्यात आले आहे; परंतु अजूनही ७५ टक्के शेतकऱ्यांजवळ अँड्रॉईड स्मार्टफोन उपलब्ध नाहीत. काही शेतकऱ्यांजवळ मोबाईल आहे, तर पीक पेरा नोंदणी करण्याची प्रक्रिया माहीत नाही. या परिसरातील काही भागात नेटवर्क मिळत नाही. अशा अनेक अडचणींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे.

---

अमरावतीत फसव्या जन्म प्रमाणपत्र प्रकरणी

# किरीट सोमय्यांनी गाडगेनगर पोलिसांकडे दिले नवे पुरावे

**फसव्या जन्म दाखल्यांप्रकरणी मोठ्या प्रमाणात फसवणूक झाल्याचा आरोप**
**पोलीस आयुक्तांशी चर्चा; ४९० संशयित अर्जदार बेपत्ता**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती –** बांग्लादेशी आणि रोहिंग्या घुसखोरीच्या पार्श्वभूमीवर अमरावती महापालिकेकडून दिल्या गेलेल्या जन्म प्रमाणपत्रांच्या सखोल चौकशीला सुरुवात झाली आहे. या प्रकरणात भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी पुन्हा अमरावतीत येऊन गाडगेनगर पोलिस ठाण्यात काही कागदपत्रे सादर केली.



माध्यमांशी बोलताना सोमय्यांनी सांगितले की, २१९० जन्म दाखल्यांसाठी नायब तहसीलदारांनी आदेश दिले होते, मात्र त्यापैकी १७०८ लोकांनीच अर्ज सादर केला, तेही बराच वेळ गेल्यानंतर. जर हे लोक इतके वर्ष इथे राहत होते, तर इतक्या उशिरा अर्ज का केले? अशी विचारणा त्यांनी केली.

त्याचबरोबर, ४९० लोक अर्ज करण्यासाठी हजरच झाले नाहीत – हे लोक कोण? ते कुठे गेले? त्यांचा जन्म दाखला बनवला गेला का? जर बनवला गेला असेल, तर तो वैध आहे का? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे अजूनही मिळालेली नाहीत. सोमय्यांनी यामागे मोठा कट असल्याचा संशय व्यक्त केला आहे.त्यांनी असेही सांगितले की, सादर करण्यात आलेल्या हजारो प्रमाणपत्रांपैकी अनेकांमध्ये चुकीचा पत्ता, माहितीमध्ये तफावत यांसारख्या त्रुटी आढळल्या असून काही दाखले महापालिकेने रद्दही केले आहेत.या प्रकरणी राजस्व विभागाचे अधिकारी अनुपस्थित होते, याचीही नोंद सोमय्यांनी घेतली. त्यांनी ठामपणे सांगितले की, धमक्या आल्या तरी आम्ही मागे हटणार नाही. ही चौकशी थांबवली जाणार नसल्याचे ही किरीट सोमय्या म्हणालेत.

---

# निम्नपेढी प्रकल्पातील नागरिकांच्या स्थलांतराला प्राधान्य द्यावे -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती,** पासपोर्टभातकुली तालुक्यातील निम्नपेढी प्रकल्प गतीने पूर्ण करणे आवश्यक आहे. यासाठी भूसंपादन झाल्याने स्थलांतरणासाठी आवश्यक ती प्रक्रिया करण्यात आलेली आहे. बाधित गावांमधील कुटुंबांना भेट देऊन नागरिकांनी पुनर्वसित गावात स्थलांतर करावे, यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले.



निम्नपेढी प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या पाचही गावांचा जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी आज आढावा घेतला. नागरिकांनी पुनर्वसित गावात स्थलांतर करावे, यासाठी त्यांना स्थलांतरणासाठी देण्यात येणारे एक लाख रुपयांचे अनुदान देण्यात यावे. तसेच पुनर्वसित गावात पाणीपुरवठ्याची व्यवस्था प्राधान्याने करण्यात यावी. यामुळे नागरिकांचा कल पुनर्वसित गावात जाण्याकडे राहील. सिंचन प्रकल्पासाठी भूसंपादन झाल्यानंतर या ठिकाणी असलेल्या सार्वजनिक सुविधा पुनर्वसित गावात स्थलांतरित करण्यात यावे. प्रामुख्याने रेशन दुकान, शाळा, ग्रामपंचायत कार्यालय स्थानांतरित केल्यास नागरिकांचे स्थलांतरण गतीने होण्यास मदत मिळेल. सध्यास्थितीत गावामध्ये राहत असलेल्या नागरिकांनी चर्चा करून त्यांना पुनर्वसित गावात घरकुल उपलब्ध करून देण्याविषयी सकारात्मक पावले उचलण्यात यावीत, असा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी दिल्या.

---

# डाक विभागाची बचत उत्सव मोहिम

## सुकन्या समृध्दी खाते उघडण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती,** १४: अमरावती डाक विभागातर्फे बचत उत्सव विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. यात मुलींच्या नावे सुकन्या समृद्धी खाते उघडावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते डाक विभागात सुकन्या समृध्दी योजना सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत पालक आपल्या १० वर्ष वयापर्यंतच्या मुलींचे खाते डाकघरात किमान २५० रूपये भरून उघडू शकतात. योजनेचा सध्याचा व्याजदर ८.२ टक्के असून सदर खाते काढण्याकरीता मुलीचा जन्माचा दाखल, आधार कार्ड, तसेच पालकाचे आधारकार्ड, पॅनकार्ड इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत.

जिल्ह्यातील डाक अधिकारी, कर्मचारी, शाळा, अंगणवाडी तसेच घरोघरी जाऊन मुलीच्या उज्वल भविष्यासाठी जनजागृती करत आहेत. पालकांनी आपल्या मुलीचे सुकन्या समृद्धी खाते उघडावे, तसेच डाक विभागाच्या इतर बचत योजनांचाही लाभ घ्यावा, असे आवाहन प्रवर अधीक्षक डाकघर यांनी केले आहे.

---

# आठ दिवसांत दुसरी लूट


## वरुड पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०वरूड**

शहरात दिवसाढवळ्या होत असलेल्या लूटमारीच्या घटनांनी व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मंगळवार दि. ९ ला दुपारी सुमारे बारा वाजता ख्रिश्चन बंगल्यासमोर प्रतिष्ठित व्यवसायी नंदकिशोर जयस्वाल यांच्यावर अज्ञात इसमांनी धाडसी हल्ला करून तब्बल साडेचार लाख रुपयांची लूट केली.

या अगोदर सुद्धा आठ दिवसांपूर्वी जागृत शाळेसमोर एका ठेकेदाराला लुटल्याची घटना घडली होती. अल्पावधीत घडलेल्या या दोन घटनांमुळे शहरातील व्यापारी व सामान्य नागरिकांमध्ये तीव्र असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. पोलिसांच्या गस्त व्यवस्था, गुप्त माहिती यंत्रणा व कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

घटनेनंतर वरुड व्यापारी संघ तसेच कन्फेडेरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स यांनी तत्काळ बैठक घेऊन या



लूट प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींना तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे. तसेच शहरात प्रभावी पोलिस गस्त वाढवावी, व्यापारी व नागरिकांना सुरक्षित वातावरण निर्माण करून द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे.व्यवसायिकांवर झालेल्या सलग लुटीच्या घटनांनी वरुड शहर हादरले असून, पोलिस प्रशासनाकडून ठोस कारवाई न झाल्यास व्यापारी संघटनांकडून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. अल्पावधीत घडलेल्या या दोन घटनांमुळे शहरातील व्यापारी व सामान्य नागरिकांमध्ये तीव्र असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

---

# डीपीजवळ शॉक लागून बैलाचा मृत्यू

## धारणी तालुक्यात ९० टक्के डीपी उघड्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०धारणी**

धारणी तालुक्यातील ग्राम बिरोटी येथील महावितरणची डीपी उघडी असल्याने जीवंत तारांचा शॉक लागून बैलाचा मृत्यू झाला.या घटनेमुळे गावातील नागरिकांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. सुदैवाने बैलामागे असलेला व्यक्ती मात्र बचावला. उल्लेखनीय असे की, धारणी तालुक्यातील अनेक गावात डीपी उघड्या असल्याने धोका निर्माण झाला आहे.

बिरोटी गावातील शेतकरी धनराज पकर या शेतकऱ्याचा बैलाचा डीपीचा शॉक लागून मृत्यू झाला. याबाबत धनराज पकर यांनी महावितरणधारणीकडेतार केली असून खुल्या डीपीसाठी जबाबदार कर्मचाऱ्यावर कारवाई व नुकसान भरपाईची मागणी केली आहे. बैलाचा मृत्यू झाल्यामुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक



नुकसान झाले आहे.

---

# उर्ध्व वर्धा जलाशयजवळील जमीन भाडेपट्टीसाठी अर्ज आमंत्रित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती,**

उर्ध्व वर्धा जलाशयाच्या सभोवतालची जमीन भाडेपट्टीवर देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुकांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

उर्ध्व वर्धा जलाशयाच्या बुडीत क्षेत्राच्या काठाभोवतालची ३४२.५० मीटर ते ३४३ मीटर तलांकातील अमरावती जिल्ह्यातील २९८.२२ हेक्टर आणि वर्धा जिल्ह्यातील ३०.६० हेक्टर गाळपेर जमीन रब्बी हंगाम आणि तलांक ३४० मीटर ते ३४२.५० मीटरमधील अमरावती जिल्ह्यातील ८०६ हेक्टर आणि वर्धा जिल्ह्यातील ५३ हेक्टर जमीन दरवर्षी उन्हाळी हंगामाकरीता उपलब्ध होऊ शकते.

गाळपेर जमीन भाडेपट्टीवर देण्याकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत. ज्या व्यक्तींच्या जमिनीच नवीन जलाशय, उत्प्लव बांध, धरण इत्यादी बांधण्यासाठी संपादीत केलेली आहे. किंवा कोणत्याही शासकीय प्रकल्पामुळे अथवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा प्रकल्पामुळे ज्यांना बाधा पोहचली आहे अशा व्यक्ती, स्थानिक भूमीहिन, मागासवर्गीयांच्या सहकारी संस्था, ज्यामध्ये बहुसंख्य मागासवर्गीय सदस्य आहेत, अशा मागासवर्गीय आणि मागासवर्गीयेतर स्थानिक भूमिहीन व्यक्तीच्या सहकार संस्था, स्थानिक भूमिहीन व्यक्तीच्या सहकार संस्था, स्थानिक भूमिहीन मागासवर्गीय लोक, इतर वर्गातील स्थानिक भूमिहीन लोक, जेथे गाळपेर जमिनी आहेत, त्या गावच्या बाहेरील भूमीहिन लोक, या व्यतिरिक्त लोकांव्यतिरीक्त इतर स्थानिक भूमिधारक परंतू खंड एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींपैकी उपलब्ध होणारी



गाळपेर जमिनीची मौजे व शेतसर्वे व मूळ मालकनिहाय यादी आणि १०० रूपयांच्या स्टॅम्प पेपरवर करावयाच्या करारनामा आणि अर्जाचे प्रारूप उपविभागीय अभियंता, उर्ध्व वर्धा पाटबंधारे उपविभाग क्रं. १, मोर्शी येथे दि. १५ सप्टेंबर २०२५ पर्यत द्यावे लागणार आहे.

पात्र लाभार्थ्यांना प्रत्येक कुटूंबांला जास्तीत जास्त १.२० हेक्टर जमीन भाडेपट्टीवर देण्यात येणार आहे. परंतू कुटूंब प्रमुख हा जर सहकारी संस्थेचा सदस्य असल्यास त्यास मुंबई कुळवहीवाट व शेतजमीन अधिनियम १९७८ च्या कलम ६ मध्ये ठरवून दिलेल्या निर्वाहक क्षेत्राच्या मर्यादेस अधिन राहून जास्तीत जास्त १.६ हेक्टर इतकी जमीन देता येईल. भाडेपट्टीचा दर हा जलसंपदा विभागाच्या पत्रानुसार एका वर्षात दोन पिके घेतली गेल्यास प्रति हेक्टरी रूपये २ हजार रूपये प्रति ११ महिन्यासाठी व एका वर्षात एकच पिक घेतले गेल्यास प्रति हेक्टरी १ हजार रूपये प्रति ११ महिन्यासाठी भरणे आवश्यक आहे, असे उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी कळविले आहे.-

# राजकमल चौकातील रेल्वे पुलाच्या बांधकामास सेतुबंधन योजनेतून निधी देणार

## खासदार बळवंत वानखडे यांच्या पत्रावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**



अमरावती शहरातील मुख्य व वर्दळीच्या ठिकाणी असलेला रेल्वे ओव्हर ब्रिज ला ५० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. परंतु सदर पूल वापरण्यायोग्य नसल्याने दिनांक २७ ऑगस्ट २०२५ पासून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पादचारी तसेच वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे.सदर पुलाचे बांधकामास ३०० कोटी इतका खर्च अपेक्षित असून केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत सेतूनबंधन योजनेतून पुलाच्या बांधकामास निधी देणार असल्याचे आश्वासन मा. केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनी खासदार बळवंत वानखडे यांना दिले. अमरावती शहरातील मुख्य व वर्दळीच्या ठिकाणी असलेला रेल्वे ओव्हर ब्रिज ला ५० वर्षांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. सदर पुलाचे सार्वजनिक बांधाकम विभागामार्फत तसेच राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालय , अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने सदर पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट सदर पूल देखभाल दुरुस्तीअभावी आतून ठिसूळ झाला असल्याने सदर पूल केव्हाही कोसळू शकतो. याचीच खबरदारी म्हणून दिनांक २७ ऑगस्ट २०२५ पासून सदर पूल वाहतूक तसेच पादचारी मार्गासाठी संपूर्णता बंद केला आहे. परंतु शहरातील हा मुख्य मार्गावरील पूल असल्याने शहरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. तसेच याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आहे. सदर पुलाच्या बांधकामासाठी किमान ३०० कोटी रुपयांची आवश्यकता आहे. याबाबत खासदार बळवंत वानखडे यांनी मा. श्री. नितीनजी गडकरी , केंद्रीय मंत्री यांची दिनांक ०९/०९/२०२५ रोजी संसद भवन दिल्ली येथे भेट घेतली. तसेच शहरात या पूलांवरून बंद झालेली वाहतूक यामुळे शहरातील वाहतूक कोंडी , वाहतुकदारांचे हाल , व पुलाचे बांधकाम तातडीने करण्याची आवश्यकता याबाबत वस्तुस्थिती मांडली. तसेच पुलाच्या बांधकामास तातडीने ३०० कोटी निधी उपलब्ध करून देण्याची लेखी पत्राद्वारे मागणी केली. सदर पुलाच्या बांधकामास केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत सेतुबंधन योजनेतून निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन मा. श्री. नितीनजी गडकरी दिले. यावेळी खासदार कल्याण काळे , खासदार डॉ शिवाजी काळगे उपस्थित होते.

# केबल तंत्रज्ञ बनून आलेल्यांनी न्यायाधीशांच्या घरात केली चोरी

## सुमारे ४५ ग्रॅम सोन्यांच्या दागिन्यासह १२ हजार रोख लंपास


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

शहरातील एका महिला न्यायाधीशांच्या घरात - मंगळवारी ९ सप्टेंबरला दुपारी चोरी झाली. ही चोरी करण्यासाठी चोरटे केबल टेक्निशिअन बनून आले होते. या चोरट्यांनी न्यायाधीशांच्या बाघरातून सुमारे ४५ ग्रॅमचे सोन्याचे दागिने व १२ हजार लंपास केले. शहरात सकाळी तोत्या मी पोलिसांनी दोन महिलांचे दागिने लूटले असून, पोलिस यंत्रणा तोतयांच्या मागावर असतानाचसायंकाळी ही घटना समोर आली आहे. गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एकाअपार्टमेंटमध्ये महिला न्यायाधीश राहतात. चोरटे या अपार्टमेंटमध्ये शिरले. त्या चोरट्यांनी मंगळवारी दुपारी घरी कोणीही नसताना दोन केबल टेक्निशियन असल्याचे भासवून सोसायटीत प्रवेश केला. त्यावेळी वॉचमनने घरी कुणी नसल्याचे सांगूनही ते थेट घरात शिरले आणि घरातील कपाटातून अंदाजे ४५ ग्रॅम सोन्याचे दागिने व रोख चोरून नेली. या घटनेची माहिती मिळताच पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, गाडगेनगरचे ठाणेदार अतुल वर यांच्यासह गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण व पोलिसांचा ताफा घटनास्थळी पोहोचला होता.

# महापालिकेचे कर्मचारी वेतनाशिवाय दोन महिने थांबले, आता सण साजरा की उपासमार?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० अमरावती**

अमरावती महापालिकेतील कर्मचारी तब्बल दोन महिन्यांपासून वेतनाशिवाय काम करत आहेत. एकीकडे शासकीय कर्मचाऱ्यांना गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला वेतन देण्यात आले, तर दुसरीकडे महापालिकेचे कर्मचारी अजूनही जुलैच्या पगाराची वाट पाहत आहेत. अशा स्थितीत गौरी-गणपतीचा सण साजरा करणं त्यांच्या दृष्टीने आर्थिक संकटासारखं ठरत आहे.



दररोज आज पगार होईल, उद्या होईल या आशेवर दिवस काढणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संयमाचा बांध फुटू लागला आहे. राज्य सरकारकडून महापालिकेस सहायक अनुदान दिलं जातं, मात्र अर्थमंत्रालयाच्या टाळाटाळीमुळे आणि मनपाची आर्थिक दुर्दशा यामुळे हे वेतन रखडलेलं आहे.या गंभीर परिस्थितीत महापालिका कर्मचारी राज्यस्तरीय समितीने थेट मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे तक्रार दाखल केली आहे. अमरावतीसह राज्यातील शेकडो महापालिकांतील कर्मचारी वेतनाअभावी सणासुदीच्या काळातही कसेबसे दिवस ढकलत आहेत.''आम्ही उपाशी राहून शहर स्वच्छ ठेवतो, पण सरकारकडून उपेक्षा मिळते, अशी तीव्र भावना कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे.पुढील पितृपक्ष, नवरात्रोत्सव, दसरा हे सण तरी सन्मानाने साजरे करता यावेत, यासाठी तातडीने वेतन देण्याची गरज असल्याचं समितीनं स्पष्ट केलं आहे. अन्यथा आंदोलक पवित्रा घेण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# जालन्यातून बदली झालेले युवराज मेत्रे अजूनही अमरावतीत रुजू नाहीत

## तरीही शो कॉज नोटीसमध्ये नाव गायब! शासनाचा दुजाभाव?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**




बदली आदेशानंतर ठरावीक मुदतीत रुजू न झालेल्या जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांना राज्य शासनाने कारणे दाखवा (शो कॉज) नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत. पण आश्चर्य म्हणजे यात अमरावतीचा उल्लेखच नाही. एवढेच नव्हे तर जालना येथील बीडीओ युवराज मेत्रे, ज्यांची अमरावती जिल्हा परिषदेत सामान्य प्रशासन विभागाचे डेप्युटी सीईओ म्हणून बदली झाली होती, ते आजवर रुजूच झालेले नाहीत. तरीदेखील त्यांच्या नावाचा उल्लेख या कारवाईत टाळण्यात आल्याने शासनाच्या दुजाभावावर बोट ठेवले जात आहे.

ग्रामविकास विभागाच्या अवर सचिव डॉ. उर्मिला जोशी यांनी ९ अधिकाऱ्यांना शो कॉज नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत. शिस्तभंगविषयक कारवाई का करू नये? असा जाब विचारत संबंधितांकडून खुलासा मागविण्यात आला आहे. आवश्यकता भासल्यास विभागीय आयुक्तांमार्फत शासनास कारवाईचा प्रस्तावही सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पण या यादीत अमरावतीचा उल्लेख नाही, हे मात्र धक्कादायक आहे.

शासनाने बदल्या करताना स्पष्ट आदेश दिले होते की, अधिकारी त्वरित जुनी आस्थापना सोडून नव्या पदावर रुजू होतील. तरीही अडीच ते तीन महिने उलटूनही अनेक अधिकारी पदभार स्वीकारण्यास टाळाटाळ करत आहेत. अशा अधिकाऱ्यांवर शासनाने कडक भूमिका घेतली असताना युवराज मेत्रे यांना वगळण्यात आले, हा शासनाचा सौम्य पवित्रा की जाणूनबुजून दिलेली सूट? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

अमरावतीत आणखी काही अधिकारी बराच काळ रुजू न झाल्याने त्यांच्याविरोधात शिस्तभंगविषयक प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आल्याचे समजते. मात्र त्या यादीत मेत्रे यांचे नाव आहे की नाही, हे अजूनही गूढच आहे.

# गावाच्या बदनामीप्रकरणी महिलेविरुद्ध पोलिस तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नेरपिंगळाई**

नेरपिंगळाई गावाची बदनामी करत सोशल मिडियावर पोस्ट व्हायरल करणाऱ्या एका ३५ वर्षीय महिलेविरुद्ध गावकऱ्यांनी प्रचंड रोष व्यक्त केला. या महिलेविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल करण्यासाठी अनेक गावकरी सोमवारी ८ सप्टेंबरला उशिरा रात्री पोलिसांत पोहोचले होते. या प्रकरणात गावच्या सरपंच सविता खोडस्कर यांच्या तक्रारीवरुन संबंधित महिलेविरुद्ध शिरखेड पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

नेरपिंगळाई गावात हजारो वर्षापासून संत परंपरेनुसार गणेश उत्सव साजरा केला जातो. येथेगणेश उत्सवाची फार जुनी परंपरा आहे. नवीन पिढीसुद्धा त्याच परंपरा पुढे नेत आहे.अश्यातच एका २५ वर्षीय महिलेने सोशल मीडियावर गावातील महिलांबाबत आक्षेपार्ह टिप्पणी केली.या प्रकारामुळे नेरपिंगळाईच्या नावाचा लौकिक मलीन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. सरपंच खोडस्कर यांच्यासह मोठ्या संख्येत गावकरी सोमवारी उशिरा रात्री शिरखेड पोलिस स्टेशनमध्ये पोहोचलेत. या वेळी सरपंच खोडस्कर यांनी तक्रारीवरुन पोलिसांनी तत्काळ संबंधित महिलेविरुद्ध अदखपात्र गुन्हा दाखल केला आहे.

# गुन्हेगारीचा 'गांधी' अखेर गजाआड! - दहा गंभीर गुन्ह्यांनंतर यश तायडेवर MPDA अंतर्गत कडक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

शहरातील दुर्दम्य गुन्हेगारीला पोलिसांनी अखेर आळा घातला आहे. दोन वर्षांत दहा गंभीर गुन्हे करणाऱ्या यश उर्फ गांधी विनोद तायडे (वय २०, रा. कल्याण नगर) याच्यावर चझऊ- (महाराष्ट्र प्रतिबंधक धोका अधिनियम) अंतर्गत कठोर कारवाई करत त्याला थेट मध्यवर्ती कारागृहात डांबण्यात आले आहे.

यश तायडे हे नाव अमरावतीच्या गुन्हेगारी विश्वात दहशतीचं बनलं होतं. जबरी चोरी, प्राणघातक हल्ला, दंगल, अवैध शस्त्र बाळगणे, शांतता भंग, तडीपारीचे उल्लंघन अशा गंभीर स्वरूपाच्या दहा गुन्ह्यांची नोंद फक्त दोन ते अडीच वर्षांत झाली. याआधी तडीपार आणि प्रतिबंधक कारवाया करूनही त्याने गुन्हेगारी थांबवली नाही.

शहरात कायदा-सुव्यवस्थेचा खेळखंडोबा करणाऱ्यांसाठी ही मोठी धडक कारवाई मानली जात आहे.फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार रोशन शिरसाट यांनी तायडेविरुद्ध चझऊ- अंतर्गत प्रस्ताव सादर केला होता. एसीपी शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली चझऊ- सेलचे अजय मिश्रा, चेतन कराडे, एसीआय इम्रान नायकवडे व पीएसआय राहुल महाजन आणि संदीप देशमुख यांनी संयुक्तपणे ही कारवाई सोमवारी (९ सप्टेंबर) पूर्ण केली. पोलिस आयुक्त अरविंद चाकरीया यांनी ८ सप्टेंबर रोजी आदेशावर स्वाक्षरी करताच तायडे याला कारागृहात हलवण्यात आले.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या सण-उत्सव आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शहरातील असामाजिक तत्वांवर विशेष लक्ष ठेऊन अशाच प्रकारच्या कठोर कारवाया सुरू राहणार आहेत. पोलिसांच्या रडारवर आणखी काही गुन्हेगार असून, लवकरच त्यांच्यावरही चझऊ-सारखी कडक कारवाई होणार आहे.

# इलेक्ट्रिक बससाठी अमरावतीकरांना अजून दोन वर्षांची प्रतीक्षा!बस स्टेशनचं काम निविदा प्रक्रियेत अडकले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

अमरावती महानगरपालिकेला केंद्र शासनाच्या योजनेतून सिटी इलेक्ट्रिक बससाठी कोंडेश्वर येथे जमीन उपलब्ध झाली असली, तरी प्रत्यक्ष बस स्टेशन आणि मेंटेनन्स सेंटरचं काम अद्यापही निविदा प्रक्रियेत अडकलं आहे. पाच कंपन्यांनी निविदा भरल्या असूनही तांत्रिक व आर्थिक बीड अजूनही उघडल्या गेलेल्या नाहीत.

महत्त्वाची बाब म्हणजे, ही प्रक्रिया मागील एक ते दीड महिना मनपा कर्मचाऱ्यांच्या संपामुळे आणि गणेशोत्सवाच्या सुट्ट्यांमुळे थांबलेली होती. तांत्रिक बीडच्या शहानिशीशिवाय आर्थिक बीड उघडता येत नाही. एकदा तांत्रिक बीडमध्ये पात्रता मिळाल्यानंतरच फायनान्शियल बीड उघडली जाते आणि त्यानंतर 'एल-१' म्हणजेच सर्वात कमी दर देणाऱ्या कंपनीला कंत्राट दिलं जातं.

त्यानंतरच्या टप्प्यात करारनामा, कार्यारंभ आदेश, प्रत्यक्ष कामाला सुरुवात या सगळ्या प्रक्रिया वेळखाऊ असल्याने प्रत्यक्ष बस स्टेशन आणि मेंटेनन्स केंद्र उभं राहायला किमान एक ते दीड वर्ष लागू शकतो. त्यामुळे अमरावतीकरांना इलेक्ट्रिक सिटी बसमध्ये बसून प्रवास करण्यासाठी किमान दोन वर्षांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.मनपा अभियंत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या एक-दोन दिवसांत तांत्रिक बीडची तपासणी पूर्ण करून आर्थिक बीड उघडण्याची शक्यता आहे. मात्र, त्यानंतरही उर्वरित प्रक्रिया आणि बांधकामासाठी बराच वेळ लागणार आहे.

# शिरखेडमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीची उत्साहात सांगता



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०शिरखेड**

श्री संत नानागुरु महाराज मंदिरातील गणेश विसर्जन मिरवणूक मोठ्या उत्साहात पार पडली. बारा दिवस चाललेल्या गणेशोत्सवाची सांगता ८ सप्टेंबर रोजी गणेश मूर्तीच्या विसर्जनाने झाली. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या च्या घोषात शहरात आनंदोत्सव साजरा झाला. शहरातील दहा सार्वजनिक मंडळांनी काशी नदीच्या पात्रात विसर्जन केले.

सकाळी ९ वाजता बाजार चौकातून ढोल-ताशांच्या गजरात, गुलाल-फुलांची उधळण करत मिरवणूक निघाली. हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. स्वराज फाउंडेशनने पाण्याची, फराळाची व अँब्युलन्सची सेवा पुरवली. दुपारी ४ वाजता ४० क्विंटल ज्वारीच्या कण्या, ८० क्विंटल कोहळ्याची भाजी व ४५ पिपे गोळे तेलाचा महाप्रसाद वाटप करण्यात आला, ज्याचा लाभ ४० ते ४५ हजार भाविकांनी घेतला.विसर्जन शांततेत पार पाडण्यासाठी ठाणेदार सचिन लुळे यांच्या नेतृत्वाखाली ३ अधिकारी, १९ पोलिस, १८ सैनिक व ड्ळझक्रतैनात होते. सर्व कार्यक्रम शांततेत व भक्तिभावात पार पडले.

# ईद मिल्लादुन्नबीनिमित्त ऑनलाइन अजान स्पर्धा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अंजनगाव सुर्जी**

येथे ईद मिल्लादुननबी निमित्त ऑनलाइन अजान स्पर्धा घेण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अफसर बेग, अमिन शेख, वसिम खान, जावेद शेख, सै कलिम, शेख अलिम यांच्या तर्फे तर्फे हे आयोजन केले होते. चार दिवस चाललेल्या या स्पर्धेत दहा ते अठरा क्योगटातील मुलांना व्हाटसअ‍ॅपद्वारे अजान आयोजकांना पाठवणे बंधनकारक करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण ७० स्पर्धकांनी भाग घेतला. ऑनलाइन अजान स्पर्धा घेण्याचे उद्दिष्ट समाजातील मुलांमध्ये जागरूकता आणून प्रत्येक घर अजान असा होता. प्रथम बक्षीस पाच हजार, द्वितीय बक्षीस तीन हजार, तृतीय बक्षीस दोन हजार व भाग घेणाऱ्या प्रत्येक स्पर्धकाला आयोजकांकडून सन्मान चिन्ह देण्यात आले, या स्पर्धेचे ८ सप्टेंबरला बक्षीसवितरण करण्यात आले. एकूण स्पर्धकांमधून १२ उत्कृष्ट स्पर्धक निवडून त्यांच्यात फायनल अजान स्पर्धा घेण्यात आली. अंतिम ३ मध्ये प्रथम मोहम्मद मिसबाह, द्वितीय फारिक मोहम्मद, तृतीय मुसदिक मोहम्मद यांनी बक्षीस पटकावले. या वेळी पंच कमिटीत हाफिज आसिफ, मुफ्ती जावेद, कारी यासीर अरफात, कारी शकील, कारी सलमान यांनी भूमिका बजावली. अकिल सुफी, नसरुलाह खान, भुर्वा खान, डॉ डांगरे, शेख सलीम यांनी सहकार्य केले. या बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष मुफ्ती जाकीर, प्रमुख पाहुणे म्हणून मोहम्मद फहीमोददीन, आशिक अंसारी, वाजीद मंसुरी, शेख हारून, मुजफ्फर, आरिफ, हाजी अजहर, फराज, हाजी इरफान हाजी फैजल, जाहीर बेग आदी मान्यवर स उपस्थित होते. संचालन नाजीम खतीब यांनी केले.

# नेपाळ हिंसाचारात अमरावतीकर अडकले! जीव वाचवण्यासाठी शर्यत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

नेपाळमध्ये सुरू असलेल्या हिंसक आंदोलनामुळे तेथील परिहिंसाचारामुळे पेटलेल्या नेपाळमध्ये अमरावतीमधील नागरिक अडकले, स्वतःचा जीव वाचवतस्थिती दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. या दंगलीत अडकलेल्या अमरावती जिल्ह्यातील काही नागरिकांनी आपले भयावह अनुभव प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले आहेत.



गेल्या सात वर्षांपासून नेपाळमध्ये नोकरी करणारे अजय गौर यांनी या हिंसेचा थेट अनुभव घेतला. ते म्हणाले, मला वाराणसीला जायचे होते आणि रेल्वेचे आरक्षणही झाले होते. मात्र, दंगलीत अडकल्याने माझी रेल्वेगाडी सुटली. मनारी ते हटोडा दुचाकीने प्रवास करताना रस्त्यांवर जळालेल्या गाड्या दिसल्या. स्वतःचा जीव वाचवत कसाबसा पोहोचलो आणि सध्या एका हॉटेलमध्ये आश्रय घेतला आहे. जिथे आहे तिथेच राहा, अशा सूचना मिळाल्याने आम्ही भीतीच्या वातावरणात जगत आहोत.

नेपाळमधील या परिस्थितीमुळे भारत सरकारने तेथील भारतीय नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. आंदोलकांनी केलेल्या जाळपोळीमुळे विमानतळ परिसरात धुराचे लोट उठले असून, अनेक उड्डाणे स्थगित करण्यात आली आहेत. ८ सप्टेंबरपासून सुरू झालेल्या या हिंसक आंदोलनात आतापर्यंत किमान २१ जणांचा मृत्यू झाला आहे. मंगळवारीदेखील काठमांडूसह नेपाळमधील अनेक ठिकाणी तणावपूर्ण परिस्थिती होती आणि आंदोलने सुरूच होती.

नेपाळमधील तणावपूर्ण परिस्थिती लक्षात घेता, भारतीय नागरिकांना परिस्थिती सामान्य होईपर्यंत नेपाळचा प्रवास टाळण्याचा सल्ला देण्यात येत आहे. नोकरीनिमित्त महाराष्ट्रातील अनेक तरुण नेपाळमध्ये आहेत आणि त्यांना या आंदोलनाची तीव्रता जाणवत आहे. अमरावती जिल्ह्यातील अक्षय कान्हेरकर यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, सध्या नेपाळमध्ये जी परिस्थिती निर्माण झाली आहे, त्याची चाहूल आधीच लागली होती. युवकांमधील रोष वाढत चालला होता, पण त्याचे असे हिंसेत रूपांतर होईल, याचा विचारही केला नव्हता. मी सहा वर्षे नेपाळमधील बुटवॉल येथे नोकरी केली. अलीकडेच परत आलो, पण माझे अनेक मित्र अजूनही तिथे आहेत. त्यांच्याशी बोलणे झाले. हे वातावरण लवकरच शांत व्हावे आणि सर्वांना सुरक्षित राहाता यावे, अशी माझी इच्छा आहे.

नेपाळमध्ये समाज माध्यमांवर बंदी घातल्यानंतर संतप्त झालेल्या तरुणांनी निदर्शने करण्यास सुरू केली आणि त्यांनी देशाच्या राजधानीचा ताबा घेतला. या आंदोलनादरम्यान पोलिसांनी केलेल्या गोळीबारात अनेक जण ठार झाले आहेत.सोमवारी रात्री समाज माध्यमांवरील बंदी उठवण्यात आली मात्र निदर्शने सुरूच राहिली. यादरम्यान काठमांडू येथील विमानतळ देखील बंद करण्यात आला.

# ‘आपल्याचं’ महिलांवर अन्याय? भाजप महिला मोर्चात ‘मित्रपक्ष’ महिलांचा दबदबा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० अमरावती**

भाजप महिला मोर्चाच्या अमरावती शहर कार्यकारिणीच्या नुकत्याच झालेल्या घोषणेनंतर पक्षातच नाराजीचे सूर उमटू लागले आहेत. कार्यकारिणीत स्थानिक भाजप महिला कार्यकर्त्यांऐवजी मित्रपक्षांच्या महिलांचा भरणा झाल्यामुळे जुन्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे.



महिला मोर्चाच्या नव्या कार्यकारिणीमध्ये १६० महिलांचा समावेश असून, यात अध्यक्ष, २० उपाध्यक्ष, सरचिटणीस, सचिव, कोषाध्यक्ष, कार्यालय मंत्री, मिडिया प्रमुख, प्रकल्प प्रमुख, महामंत्री अशा विविध पदांचा समावेश आहे. मात्र, यामध्ये भाजपच्या जुन्या आणि अनुभवी महिला कार्यकर्त्यांऐवजी इतर मित्रपक्षातील महिलांना मोठ्या प्रमाणावर स्थान देण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, अनेक माजी नगरसेविकांना केवळ ‘विशेष निमंत्रित’ म्हणून स्थान देण्यात आले आहे, जे अपमानास्पद असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. शहरातील अनेक कार्यकर्त्यांनी पक्षासाठी वर्षानुवर्षे काम करूनही या नव्या यादीत त्यांचे नाव न आल्याने नाराजी व्यक्त केली आहे.

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने ही कार्यकारिणी तयार केली असली, तरी त्यात स्थानिक महिला कार्यकर्त्यांना डावलले गेले आहे. यामुळे भाजपला आपल्याच कार्यकर्त्यांच्या अनुभवाची गरज नाही का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.पक्षात वाढणारी ही नाराजी भाजपसाठी आगामी निवडणुकीत अडचण ठरू शकते, असे निरीक्षकांचे म्हणणे आहे. पक्षाने नाराज कार्यकर्त्यांचे समाधान करून, स्थानिक कार्यकर्त्यांच्या योगदानाची योग्य दखल घ्यावी, अशी मागणी आता उघडपणे होऊ लागली आहे.

**यांना मिळाले कार्यकारिणीत स्थान**

अध्यक्ष म्हणून सुधा तिवारी, उपाध्यक्ष मेघा हिंगासपुरे, देवांगणा लकडे, अलका सप्रे, छाया अंबाडकर, पूजा जोशी, ज्योती वैद्य, नलिनी चिखलकर, ममता चौधरी, प्रतिभा तिडके, दिपा बेलबागकर, रजनी आमले. सतनामकौर हुडा, उज्वला काळबांडे, डॉ. रोमा बजाज, अलका सदार, ॲड. श्रध्दा पाटेकर, सविता पाटेकर, सविता ठाकरे, किरण मुंदडा, प्रिती कराळे, आशा चावला, दिपाली काळे, लता मुंदडा, भारती शर्मा, वंदना राजू लाठिया, डॉ. अलका राजपुरिया, श्रध्दा दुबे, सरचिटणीस सविता भागवत, शितल वाघमारे, जयश्री कुबडे, गौरी मेघवानी, जया माहोरे, सचिव गीता सावरकर, वर्षा तायडे, अर्चना पुंड, रंजना चामट, सिमा बत्रा, रचना टापर, लिना जावरे, श्रध्दा गहलोत, कोमल आहूजा, भावना कुंदळे, राणी ठाकुर, प्रीती ठाकुर, कल्याणी मुदलियार, रोशनी वाकडे, ज्योती राठोड, स्मिता सरवैय्या, सरवैय्या, अरुणा चौधरी, सुषमा कोठीकर, प्रिती शाह, माया लकडे, शुभांगी आसलकर, रेखा रिनवा, सुषमा मिश्रा, सारिका मिश्रा, यशिता चौबे, नेहा चौधरी, लता कोल्हे, रिना देशमुख, अपर्णा सवाई, मीना पवार, कोषाध्यक्ष मिना उपाध्याय, स्नेहल उपाध्याय यांचा समावेश आहे.

# नवरात्रोत्सवात फॅशनचा जलवा

## गुजरात-राजस्थानचे डिझायनर ड्रेस अमरावतीत हिट; किंमतींमध्ये २५% वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

शक्ती उपासनेचा उत्सव, देवीच्या नऊ रूपांची आराधना करणारा शारदीय नवरात्रोत्सव यंदा सोमवार, २२ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. शहरात धार्मिक उत्साहाबरोबरच फॅशनचीही रंगत वाढली असून, बाजारपेठा गरबा- दांडियाच्या तयारीने फुलून गेल्या आहेत. युवक-युवतींमध्ये ड्रेस खरेदीसाठी चढाओढ पाहायला मिळत आहे.



यंदा नवरात्रीत कपड्यांच्या किमती तब्बल २५ टक्क्यांनी वाढल्या असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले. तरीदेखील खरेदीवर काहीच परिणाम झालेला नाही. उलट कपडे, आर्टिफिशियल दागिने व इतर ॲक्सेसरीजच्या उलाढालीत मोठी वाढ होईल, असा अंदाज व्यापाऱ्यांनी वर्तवला आहे

नवरात्र म्हटले की गरबा आणि दांडिया अपरिहार्य! आणि गरब्यासाठी ड्रेस म्हटले की गुजरात व राजस्थानचे चनिया-चोली प्रथम पसंतीस उतरतात. रजवाडी, कच्छी वर्क, मयूरी, सनेडो, रामलीला झुमका, बोल बच्चन नवरंग, मयूरी नेट अशा डिझायनर ड्रेसला प्रचंड मागणी आहे. महिलांसोबतच पुरुषांसाठीही खास डिझायनर केडीयू आले आहेत, तर लहान मुलांसाठी पारंपरिक पद्धतीचे गोंडस ड्रेस बाजारात दिसत आहेत.

ड्रेससोबतच नक्षीकाम केलेली जॅकेट्स, फॅन्सी धोती, आर्टिफिशियल दागिने व झुमके खरेदीसाठी युवक-युवतींची उत्सुकता वाढली आहे. दांडियाच्या रंगीबेरंगी रात्रीत परिधान करण्यासाठी महिनाभर आधीपासून तयारी सुरू असते.

नवरात्रीत देवीची आराधना करण्यासाठी दररोज वेगळा रंग परिधान करण्याची परंपरा आहे. त्यामुळेच बहुतांश आयोजकांकडून दररोजची रंग थीम जाहीर केली जाते. तरुणाईही या थीमला मोठ्या उत्साहाने प्रतिसाद देते. त्यामुळे प्रत्येक दिवसासाठी वेगळा ड्रेस खरेदी करण्याकडे कल वाढला आहे.सध्या बाजारात युवक-युवतींच्या गरबा ड्रेसची किंमत साधारण १५०० ते २ हजार रुपयांपर्यंत आहे. काही डिझायनर कपड्यांचे दर याहून जास्त असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. किंमती वाढल्या असल्या तरी डिमांड कमी नाही. उलट या ९ दिवसांत कपडे, दागिने आणि फॅशन ॲक्सेसरीजची मोठी उलाढाल होणार असल्याचा अंदाज आहे.

नवरात्र हा एक धार्मिक उत्सव असला तरी आजच्या पिढीसाठी तो श्रद्धा, फॅशन आणि उत्साहाचा संगम ठरत आहे. देवीच्या आराधनेबरोबरच फॅशनचीही मुक्त उधळण दिसत आहे. पारंपरिकतेला आधुनिकतेची जोड मिळाल्याने नवरात्रोत्सवातील गरब्याची रात्र केवळ भक्तीनेच नव्हे तर रंगीबेरंगी वेशभूषेनेही उजळून निघणार आहे.

# अमरावतीत गणेशोत्सव मंडळांच्या वादातून चाकूहल्ला

## एक जखमी, आरोपी फरार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

शहरातील हमालपुरा परिसरात दोन गणेशोत्सव मंडळांमध्ये उसळलेल्या वादाचे रूपांतर चाकूहल्ल्यात झाले. मंगळवारी रात्री उशिरा घडलेल्या या घटनेत एक जण गंभीर जखमी झाले असून, हल्लेखोर फरार झाले आहेत. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिक रस्त्यावर उतरून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, जय श्रीकृष्ण गणेशोत्सव मंडळ आणि तानाजी गणेशोत्सव मंडळ यांची गणपती विसर्जन मिरवणूक हमालपुरा परिसरातून जात होती. यावेळी बालवीर गणेशोत्सव मंडळाच्या मंडपासमोरून मिरवणूक सुरू असताना जोरात बॅण्ड वाजवणे आणि गुलाल उधळणे सुरू होते. त्याचवेळी बालवीर गणेशोत्सव मंडळाची लाईटिंग अचानक बंद पडली.

या घटनेमुळे संतापलेल्या बालवीर मंडळाच्या कार्यकर्त्यांनी जय श्रीकृष्ण मंडळाच्या सदस्यांना हटकले. पाहता पाहता या किरकोळ वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. परिस्थिती चिघळताच काही तरुणांनी अचानक चाकू काढून जय श्रीकृष्ण मंडळाच्या कार्यकर्त्यांवर हल्ला चढवला. या हल्ल्यात तिघे जण गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

घटनेनंतर आरोपी फरार झाले असून त्यांचा शोध सुरू आहे. चाकूहल्ल्याची वार्ता समजताच परिसरातील नागरिक संतप्त झाले आणि मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. त्यांनी आरोपींना तात्काळ अटक करावी अशी जोरदार मागणी केली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, हल्लेखोरांचा शोध सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# राज्यात शेतकरी आत्महत्यांचा विस्फोट आठ महिन्यांत ११८३ बळी

## विदर्भ-मराठवाडा पुन्हा आगीत!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा थरकाप उडवणारा अहवाल समोर आला आहे. जानेवारी २०२५ ते ऑगस्ट २०२५ या केवळ आठ महिन्यांच्या कालावधीत तब्बल ११८३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. दररोज सुमारे पाच शेतकरी आत्महत्या करत असल्याचा भयावह चित्र राज्यासमोर आहे.या आकडेवारीत सर्वाधिक आत्महत्या पश्चिम विदर्भात ७०७, तर छत्रपती संभाजीनगर विभागात ५२० नोंदवण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे राज्यातील १४ जिल्ह्यांना ‘शेतकरी आत्महत्या प्रवण’ जिल्हे म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. यामध्ये विदर्भातील सहा आणि मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांचा समावेश आहे.



**फक्त यवतमाळमध्ये ऑगस्टमध्ये ४४ आत्महत्या:**

राज्यातील यवतमाळ जिल्ह्याची स्थिती अधिकच गंभीर आहे. फक्त ऑगस्ट महिन्यातच ४४ शेतकऱ्यांनी जीव दिला, ही आकडेवारी विदारक वास्तव समोर आणते. यवतमाळ पुन्हा एकदा आत्महत्येचा ‘हॉटस्पॉट’ ठरत आहे.

**आत्महत्येच्या कारणांची भयाण यादी**

शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागील प्रमुख कारणांमध्ये अतिवृष्टी आणि नापिकीने झालेलं आर्थिक नुकसान, कर्जबाजारीपणा आणि वसुलीचा तगादा, पीक विम्याच्या संदिग्ध आणि विलंबित प्रक्रियांचा फटका, योग्य हमीभावाचा अभाव आणि बाजारपेठेतील अनिष्ट स्थिती, सरकारी अनास्था आणि तातडीच्या मदतीचा अभावयांचा समावेश आहे.

**६०७ आत्महत्या पात्र, ३०६ अपात्र**

राज्य शासनाच्या अधिकृत अहवालानुसार, या ११८३ आत्महत्यांपैकी फक्त ६०७ शेतकरी आत्महत्या ‘सरकारी मदतीस पात्र’ ठरवल्या गेल्या आहेत, तर ३०६ आत्महत्या अपात्र ठरवण्यात आल्या, उर्वरित प्रकरणे अजून प्रक्रियेत आहेत. ही आकडेवारी शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांसाठी दुहेरी आघात आहे - एक तर कर्ता गमावला आणि त्यावरही सरकारी मदत नाकारली!

**शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने ‘अच्छे दिन’ कधी येणार?**

दरवर्षी वाढणारी ही आत्महत्या आकडेवारी फक्त कागदावर नोंदली जात आहे, पण त्यावर उपाययोजना मात्र अद्यापही अपुऱ्या आणि गतीहीन आहेत. शेतकऱ्यांसाठी हायटेक योजनांची घोषणा केली जाते, पण मूलभूत प्रश्न अजूनही तेवढ्याच खोलवर आहेत.एकूणच, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील वास्तव हे सरकारच्या आश्वासनांपेक्षा वेगळं आणि अधिक वेदनादायक आहे. जर त्वरित आणि ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर ही आत्महत्या लाट आणखी भयावह रूप धारण करू शकते.

# तिवसा येथे सकल बंजारा समाज तर्फे तहसीलदार यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०तिवसो**

तिवसा तालुका सकल बंजारा समाज तर्फे अनुसूचित जाती(एस टी) आरक्षण मिळण्या करिता आज दि.१० सप्टेंबर २०२५ रोजी तिवसा तहसीरदार यांना निवेदन देण्यात आले.मराठवाडा हा प्रदेश सन १९४८ पर्यंत निजाम शाशीत हैद्राबाद राज्याचा भाग होता.त्या काळातील हैद्राबाद गॅझेटीयार १९२० मध्ये लांबाडा,बंजारा(सुगळी) समाजाचा स्पष्ट उल्लेख अनुसूचित जमाती म्हणून केलेला होता.बंजारा(लभान)समाज मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रात आहे.बंजारा समाज हा ऐतिहासिक दृष्ट्या व प्रशासकीय नोंदीनुसार आदिवासी समाजा मध्ये व्हिजा तथापी मराठवाडा महाराष्ट्रात सामील झाल्यावर सन १९५६ नंतर या समाजाला ओबीसी/एनटीसी प्रवर्गात समाविष्ट करण्यात आले.परंतु तेलंगणा व आंध्रप्रदेशात याच गॅझेट चा आधार घेऊन बंजारा समाजाला अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला आहे.संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलना नंतर शासनाने मराठा समाज बांधवाना दि.०२/०९/२०२५ रोजी च्या शासन निर्णया नुसार हैद्राबाद गॅझेटीयर लागू केले.शासन स्तरावर हैद्राबाद गॅझेटीयर अधिकृतपणे स्वीकारले आणि अंमलात आणले असल्यामुळे त्याचा आधार घेऊन महाराष्ट्रातील बंजारा(लभान) समाजाला अनुसूचित जमाती(एस टी) प्रवर्गात सामील करून त्यांना या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ देण्याची सुयोग्य कार्यवाही करावी अशी सकल बंजारा समाज तर्फे विनंती करण्यात आली.यावेळी दयाराम राठोड,किशोर राठोड उपस्थित होते.

# सरकार तुपाशी, दिव्यांग उपाशी! - अमरावतीत प्रहार संघटनेचे भीक मांगो आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आज प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांनी संतप्त भीक मांगो आंदोलन करत सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली. संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, दिव्यांग व वयोवृद्ध लाभार्थ्यांचे मागील पाच महिन्यांचे अनुदान थकीत असल्याने प्रहार कार्यकर्त्यांनी सरकार तुपाशी, दिव्यांग उपाशी, भीक दया, भीक द्या अशा घोषणा देत संताप व्यक्त केला.




कार्यकर्त्यांनी हातात झळकत्या पाट्या घेऊन आणि प्रत्यक्ष रस्त्यावर लोकांसमोर भीक मागून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. काही वेळ कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर ठियाही धरला.

यावेळी प्रहार अमरावती शहर प्रमुख बंटी रामटेके यांनी इशारा दिला की, जर महिन्याभरात प्रलंबित निधी वितरित झाला नाही, तर राज्यातील काही मंत्र्यांना फिरू देणार नाही. शासनाच्या निष्काळजीपणावर रोष व्यक्त करत हा लढा अधिक तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

# महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा रद्द करा! - दर्यापूर काँग्रेसचा डेपो चौकात संतप्त एल्गार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० दर्यापूर**

नुकताच पारित झालेला महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा २४-२०२५ लोकशाही मूल्यांना गालबोट लावणारा असल्याचा आरोप करत दर्यापूर तालुका काँग्रेस ग्रामीण व शहर कमिटीने आज डेपो चौकात तीव्र निषेध आंदोलन छेडले. विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला.



अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला नाही सहन करणार, जनसुरक्षा नव्हे, जनदडपशाही!, अशा जोरदार घोषणा देत कार्यकर्त्यांनी कायद्याच्या विरोधात शांततेत पण ठामपणे निषेध नोंदवला. काँग्रेसने सांगितले की, हा कायदा भारतीय संविधानातील कलम १९ (अभिव्यक्ती स्वातंत्र्य) आणि कलम २१ (वैयक्तिक स्वातंत्र्य) चे उल्लंघन करतो.

कायद्याच्या अस्पष्ट व्याख्यांमुळे सरकारविरोधी मत मांडणाऱ्यांवर अन्यायकारक कारवाई होऊ शकते, अशी भीती यावेळी व्यक्त करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, लेखक आणि सामान्य नागरिक यांच्यावर अटक, संपत्ती जप्ती याचा धोका निर्माण करणारा हा कायदा असल्याचे निवेदनात नमूद आहे.तालुका अध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या निवेदनात मागणी करण्यात आली की, हा कायदा तात्काळ रद्द करण्यात यावा आणि त्यावर सर्वसमावेशक चर्चा घडवून आणावी.उपस्थित कार्यकर्त्यांनी निवेदनाच्या माध्यमातून स्पष्ट इशारा दिला की, लोकशाही आणि संविधानाचे रक्षण होईपर्यंत आमचा लढा सुरु राहील!यावेळी काँग्रेसच्या शेकडो कार्यकर्त्यांसह स्थानिक नागरिकांची मोठी उपस्थिती होती.



आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत